# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ / फाल्गुन २५, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री<br>(२) उप मुख्यमंत्री<br>(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(५) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

### राज्यातील विशेषत: मुंबई येथील अनधिकृत खाजगी रुग्णालये व नर्सिंग होम्सविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(१) * ७६३४ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबईतील विविध भागांमध्ये नोंदणी नसलेली खाजगी रुग्णालये व नर्सिंग होम्स मोठ्या प्रमाणावर सुरू असून, यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात शासन व संबंधित महानगरपालिका अपयशी ठरत असून नोंदणी तपासणी व प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत गंभीर त्रुटीमुळे अनधिकृत खाजगी रुग्णालयांमधील रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती सदरहू नर्सिंग होम्सवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राज्यात महाराष्ट्र शुश्रुषा नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत खाजगी रुग्णालयांची व नर्सिंग होम यांची नोंदणी व तपासणी करण्यात येते.

(२) सद्य:स्थितीत, महाराष्ट्र शुश्रुषा नोंदणी अधिनियम, १९४९ अन्वये व उपलब्ध अधिकारांच्या अधीन राहून विनानोंदणी व अनधिकृत सुरू असलेल्या रुग्णालये व नर्सिंग होम्सविरुध्द मुंबई महानगरपालिकेमार्फत

नोटीस बजावण्यात येऊन त्यांना बंद करण्याचे निर्देश देण्यात येतात. विनानोंदणी रुग्णालये व नर्सिंग होमच्या नावानिशी सर्व पोलीस ठाण्यांना कळविण्यात येते. तसेच दंडात्मक कार्यवाही देखील करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेस अदा करावयाचे कोट्यवधी रुपयांचे अनुदान व थकबाकी शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(२) * ६५६८ श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने गेल्या दोन-तीन वर्षांत अनेक मोठे प्रकल्प हाती घेतले असून सदर प्रकल्पांची आणि विकासकामांची देणी रक्कम रुपये २ लाख ३२ हजार कोटींहून अधिक झाली असून उत्पन्नाच्या स्त्रोतात विशेष फरक पडत नसल्यामुळे उत्पन्न वाढविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वत:च्या मालकीचे भूखंड ही लिलावात देण्याची तयारी सुरु केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेची मागील आर्थिक वर्षांत शासनाकडे ९ हजार ७०० कोटीं रुपयांची असलेली थकबाकी आता सन २०२५ या आर्थिक वर्षांत १० हजार ९०० कोटींवर गेली असून त्यापैकी शिक्षण विभागाकडून येणाऱ्या अनुदानाची रक्कम सर्वाधिक म्हणजेच ७ हजार कोटी रुपये असून गृहनिर्माण विभाग ९०० कोटी रुपये, नगरविकास विभाग १ हजार ५०० कोटी रुपये अशा मोठ्या प्रमाणात थकबाकी शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गंभीर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शासन स्तरावर वारंवार पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा करुनही दरवर्षी उक्त थकबाकीत वाढ होत असून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शासनाकडे आतापर्यंत थकीत असलेले १० हजार ९०० कोटी रुपये देण्याबाबत शासनाने तातडीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याकरीता महानगरपालिकेच्या विद्यमान धोरणानुसार प्रथम ३० वर्ष व नंतर ३० वर्ष मुदतवाढ अशा कालावधीकरीता प्रायोगीक तत्त्वावर ०३ भूखंड ई-निविदा प्रणालीद्वारे मक्त्याने देण्याचा निर्णय महानगरपालिकेने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी घेतला. तथापि, मलबार हिल येथील भुखंडावर बेस्ट रिसीव्हींग सेंटर असल्याने याबाबतचा निर्णय रद्द करण्यात आला. त्यानुसार महानगरपालिकेद्वारे ०२ भुखंडाबाबत निविदा काढण्यात आल्या आहेत.
(२) महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील विविध खात्यांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला शैक्षणिक अनुदान, मालमत्ता कर, मलनि:सारण आकार व जल आकार, अन्य अनुदान व वटावाच्या रकमेपोटी दिनांक ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत एकूण रुपये १०९४८.५८/- कोटी येणे बाकी आहे.

त्यानुसार शिक्षण विभागाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला शैक्षणिक अनुदानापोटी एकूण रुपये ७२४१.३८ कोटी येणे बाकी आहे.

गृहनिर्माण विभागाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिनांक ३१/०१/२०२६ पर्यंत एकूण रुपये ९३४.२८ कोटी येणे बाकी आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जिल्हाधिकारी, मुंबई शहर व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिनांक ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत एकूण रुपये २२५६.१८ कोटी तसेच शासनाच्या अन्य विभागांकडून रुपये ५१६.७४ कोटी येणे बाकी आहे.

(३) शासनाच्या विविध विभागांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस येणे असलेली थकित रक्कम अदा करणेबाबत शासनाच्या संबंधित विभागांकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सफाई कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(३) * ७३२६ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या आदेशान्वये सफाई काम हे ३६५ दिवस चालणारे अत्यावश्यक काम असून, या कामातील ठेकेदारी प्रथा बंद करण्यात यावी असे नमूद करुन देखील ठेकेदारी पध्दत अंमलात आणून मा.न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले जात असून ठेकेदारी प्रथा बंद करण्याच्या मागणीसाठी नागपूर येथे दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास भव्य मोर्चा काढून शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात नमूद असलेल्या सफाई कामगारांसाठी महर्षी वाल्मिकी व सुदर्शन सफाई कामगार असंघटित कल्याण बोर्ड तयार करणे, लाड पागे समितीच्या शासन निर्णयामुळे ३० दिवसांच्या आत नियुक्ती देणे, सफाई कामगारांना जात प्रमाणपत्रासाठी १९५० च्या वास्तव्याची अट रद्द करणे, रोजंदारी कामगारांसाठी त्वरित आदेश काढून कायमस्वरूपी नोकरी द्यावी इ. मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदारांकडून सफाई कामगारांवर अन्याय होत असून सफाई कामगारांना न्याय मिळून त्यांचे हक्क सुरक्षित करण्याच्या दृष्टीने त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ठेकेदारी पध्दत बंद करुन त्यांच्या अन्य प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ७ एप्रिल, २०१७ व दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने ३२८० कंत्राटी कामगारांना नियमित तत्त्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरु आहे. आतापर्यंत २६८१ कामगारांच्या सेवा नियमित करण्यात आल्या आहेत.

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली घनकचरा व्यवस्थापन विभागातील अधिकारी व मनपा कामगार संघटना संघर्ष समिती यांच्यासमवेत, सफाई कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदांची संख्या कमी न

करणे, त्यांच्या सेवा शर्तीत बदल न करणे, लाड पागे समितीच्या शिफारशी लागू करणे, ज्या कंत्राटी कामगारांनी सेवेत कायम करण्याबाबत न्यायालयीन प्रकरणे दाखल केली आहेत त्यांच्या दाव्यांची पडताळणी करुन पात्र कामगारांना सेवेत कायम करणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेतील पात्र कामगारांना घरे देण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणे इत्यादी विषयाबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल, या आशयाचा करार बृहन्मुंबई महानगरपालिका व संबंधित कामगार संघटनामध्ये दिनांक २८ जुलै, २०२५ रोजी करण्यात आला आहे.

सदर करारातील बाबी अंमलात आणण्याकरीता उपायुक्त (सामान्य प्रशासन) व उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांच्या अध्यक्षतेखाली व संबंधित संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या दोन समित्या बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्थापन केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालाड (प)(मुंबई) येथील डी.जी. नगर येथील सार्वजनिक मैदानाचे खाजगीकरण करण्यात येणार असल्याबाबत

**(४) * ६५८२ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (प) येथील डी.जी. नगर येथे एकमेव असलेले सार्वजनिक मैदान महाराष्ट्र पोलीस फेडरेशनने “मॅजिक क्रिकेट” या खाजगी संस्थेला देऊन सदर मैदानाचे खाजगीकरण केले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरिक, खेळाडू, विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी तसेच विविध सामाजिक व राजकीय संघटनांनीही सदर मैदानाच्या खाजगीकरणास विरोध दर्शविला असून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मैदान हे हजारो गरीब, सामान्य व होतकरु मुला-मुलींसाठी भविष्य घडविणारे एकमेव मैदान असून, सदर मैदानात स्थानिक मुलांना व युवकांना प्रवेश नाकारला जात आहे तरी सदर मैदानाचे खाजगीकरण होऊ नये व सदर मैदान सर्वांसाठी खुले राहावे याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) म्हाडाच्या मालकीच्या दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड येथील ५७.५ एकर (२,३०,००० चौ.मी.) जमीन महाराष्ट्र पोलीस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन या संस्थेला दिनांक १४/०५/१९९९ च्या करारानुसार भाडेपट्ट्याने (Lease) गृहनिर्माण पुनर्विकास योजनेसाठी देण्यात आली आहे. सदर अभिन्यासामध्ये हा भूखंड मनोरंजन मैदान (R.G.) म्हणून आरक्षित असून, खासगीकरण झालेले नाही. त्यामुळे मैदानाचे खासगीकरण झाल्याची बातमी आणि प्राप्त झालेली तक्रार वस्तुस्थितीला धरून नाही.

(३) सदर अभिन्यासाचा पुनर्विकास पूर्ण झाल्यानंतर हे आरक्षित मनोरंजन मैदान (R.G.) म्हाडाला हस्तांतरित करणे महाराष्ट्र पोलीस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन या संस्थेस बंधनकारक आहे. या मैदानाचे खाजगीकरण झालेले नसून, सदर मैदान सर्वांसाठी खुले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरासाठी मंजूर पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ७४१७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी धरण (जि.छत्रपती संभाजीनगर) हे पूर्ण क्षमतेने भरुनही छत्रपती संभाजीनगर शहरास अद्यापही आवश्यक पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना अद्यापही पाण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी ४०० कोटीं रुपयांच्या योजनेस मंजूर केले होते, तसेच माहे जून, २०१९ मध्ये राज्य शासनाने या पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देऊन व सन २०२२ मध्ये योजनेस गती देऊनही अद्यापही योजना पूर्ण करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मूळ योजना रुपये ४०० कोटी एवढ्या रकमेची असताना सध्याचे अंदाजपत्रक हजार कोटीं रुपयांहून अधिक होऊनही अद्याप सदर योजना पूर्ण न झाल्यामुळे शहरातील नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील योजना तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) छत्रपती संभाजीनगर शहराच्या सर्व भागात पर्याप्त/ पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याची वस्तुस्थिती आहे. तथापि, छत्रपती संभाजीनगर शहरास सद्य:स्थितीस अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून शहराची पाणीपुरवठ्याची भविष्यातील आवश्यकता विचारात घेता केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीस अस्तित्वातील योजना महत्तम क्षमतेने सुरू ठेऊन तसेच, नवीन योजनेतील २६ दललि जलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित करून शहरास पाणीपुरवठा करण्यात येतो ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत रुपये ३५९.६७ कोटी किंमतीच्या समांतर जलवाहिनी प्रकल्पास सन २००९ मध्ये मंजूर प्रदान करण्यात आली होती. सदरील योजनेत सन २००५-०६ ची दरसूची वापरण्यात आली होती. तद्नंतर, सन २००९ मध्ये मंजूर योजनेत संपूर्ण वितरण व्यवस्थेसह संपूर्ण योजना पीपीपी तत्त्वावर राबविण्यात आली. तथापि, कन्सेशनर यांनी कामे न केल्यामुळे महानगरपालिकेने टर्मिनेशन नोटिस देऊन महानगरपालिकेने योजना ताब्यात घेतली आहे.

छत्रपती संभाजीनगर शहराची पाणीपुरवठ्याची भविष्यातील आवश्यकता विचारात घेऊन जायकवाडी धरणावरुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये १६८०.५० कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी प्रदान करण्यात आली होती. सदर मंजूर शासन निर्णयातील स्पष्ट तरतुदीनुसार प्रस्तुत प्रकल्पाच्या रुपये २७४०.७५ कोटी किंमतीच्या सुधारित प्रस्तावास केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी प्रदान करण्यात आली असून प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील योजनेची कार्यान्वयन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण काम पाहते.

प्रस्तुत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत असून सद्य:स्थितीस प्रकल्पाची ८३% भौतिक प्रगती झालेली आहे.

छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालयाद्वारे गठित समितीमार्फत दर पंधरा दिवसांनी आढावा घेऊन संनियंत्रण केले जात आहे. प्रकल्पाच्या निधी उपलब्धतेबाबत शासनाचा सकारात्मक दृष्टिकोन आहे. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या स्वहिश्याचा निधी कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच, राज्य शासनामार्फत प्रकल्पाच्या प्रगतीच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून प्रकल्पातील उर्वरित कामे पूर्ण करून माहे डिसेंबर, २०२६ अखेर योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करून शहरास नियमित पाणीपुरवठा करण्याचे महानगरपालिकेचे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन आहे.

-----------------

## तळेगाव-चाकण-शिक्रापूर (जि.पुणे) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(६) * ७०२३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ मधील टोलमुक्तीनंतर तळेगाव-चाकण-शिक्रापूर (जि.पुणे) या महामार्गावर वाहनांची वाहतूक वाढल्यामुळे सदर महामार्गाची दुरवस्था झाली असून, गत दहा वर्षात प्रशासनाचे उक्त महामार्गाच्या देखभालीकडे दुर्लक्ष झाले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर महामार्गावरील खड्ड्यांमुळे वारंवार होणारे अपघात, मृत्यू तसेच वाहतूक कोंडी यांमुळे प्रवासी, वाहनचालकांसह रस्त्यालगतच्या स्थानिक गावकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गाच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करुन तातडीने सदर महामार्गाची दुरवस्था दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर रस्त्याची देखभाल सन २०१५ ते २०२२ या काळात राष्ट्रीय महामार्ग विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात येत होती. सन २०२२ नंतर भारतीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाच्या (MoRTH) अधिसूचनेनुसार सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती भारतीय राष्ट्रीय राजमार्ग

प्राधिकरण, पुणे (NHAI) यांचेमार्फत करण्यात येत होती. तद्नंतर, NHAI यांच्यामार्फत झालेल्या करारनाम्यानुसार सदर रस्ता दिनांक ०५/१२/२०२४ पासून MSIDC यांचेकडे हस्तांतरित झाला आहे. शासनाने (सा.बां.विभागाने) रस्त्याच्या दुरुस्ती व रुंदीकरणाच्या प्रस्तावास रुपये ५९.७५ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून सध्या हे काम प्रगतीत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग ५४८-डी (रा. मा.५५) किमी ०/०० ते किमी ५३/२०० हा रस्ता रांजणगाव, चाकण, तळेगाव व मुंबई एमआयडीसीतील प्रवासी, व औद्योगिक वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्व अवजड व स्थानिक वाहतूक या लांबी मधून होत असते परिणामी दिवसाच्या काही तासात वाहतूक कोंडी होण्याच्या समस्या निर्माण होत असतात.

(३) रस्त्याची दुरुस्ती व रुंदीकरणाच्या प्रस्तावास रुपये ५९.७५ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून हे काम सध्या प्रगतीत आहे.

तसेच MSIDC या महामंडळामार्फत तळेगाव-चाकण-शिक्रापूर रस्त्याची या ४ पदरी उन्नत मार्ग बांधणे व जमिनीस समांतर ४ पदरी रस्त्याची कि.मी ०.०० ते कि.मी ५४.०० लांबीत सुधारणा करणे असे काम खाजगीकरणाच्या माध्यमातून (PPP) नियोजित असून त्याची निविदा कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे उंच इमारतींच्या तुलनेत बचाव साधनसामग्री अपुरी असल्याबाबत

**(७)** * **७२६९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात टी.ओ.डी. झोन तसेच विकास आराखड्यात इमारतींच्या उंचीवरील बंधन काढून टाकल्यामुळे १०० मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारती उभारण्यात येत असून, उंच इमारतीच्या तुलनेत पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे असलेली बचाव साधने व वाहने अपुरी असल्याची बाब दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे केवळ ३६ मीटर, ४२ मीटर आणि ७२ मीटर क्षमतेची तीनच बचाव वाहने उपलब्ध असून १०० मीटर व त्यापेक्षा अधिक उंच इमारतींना आग लागल्यास किंवा दुर्घटना घडल्यास, त्यावरील नियंत्रण व बचावकार्य करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री अथवा पर्यायी यंत्रणा महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलास १०० मीटर व त्याहून अधिक उंच इमारतींसाठी आवश्यक बचाव वाहने व साधनसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी तसेच साधनसामग्री व वाहनांच्या खरेदीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

पुणे शहरामध्ये १०० मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारती उभ्या राहत आहेत. त्यामध्ये पूर्णत्वास आलेल्या इमारतींची संख्या सध्या कमी प्रमाणात आहे. पुणे महानगरपालिका अग्निशमन दलाकडे ३६ मीटर, ४२ मीटर आणि ७२ मीटर क्षमतेची उंच शिडीची वाहने उपलब्ध आहेत. यांच्या मार्फत शहरात अग्निशमन सेवा देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिका अग्निशमन दलाकडे ३६ मीटर, ४२ मीटर आणि ७२ मीटर क्षमतेची उंच शिडीची वाहने उपलब्ध आहेत. तसेच २८ मीटर २ उंच शिडीची वाहने व १ हॅजमट रेस्क्यू व्हेईकल खरेदी करण्याची प्रक्रिया येत्या आर्थिक वर्षात सुरु करण्यात येत आहे. उंच इमारतींमध्ये आग लागल्यास आग विझविण्यासाठी २०० मीटर उंची पर्यंत पाण्याचा मारा करणारे Constant flow & Constant pressure (जमिनीवर असणारे प्रेशर व पाणी तितकेच पाणी व प्रेशर उंचीवर मिळणे) प्रणाली चे पंप असणारे पाच अत्याधुनिक वाहने या महिना अखेरीस अग्निशमन दलात दाखल होत आहेत. या व्यतिरिक्त विविध प्रकारची ६० वाहने अग्निशमन विभागात उपलब्ध आहेत. स्थायी अग्निशमन यंत्रणे सोबतच आग लागल्यास किंवा दुर्घटना घडल्यास, नियंत्रण व बचावकार्य करण्यासाठी पुणे अग्निशमन दलाकडे आवश्यक साधनसामग्री व यंत्रणा उपलब्ध आहे. तसेच उंच इमारतीमध्ये उंच शिडीच्या वाहनांद्वारे बाहेरील बाजूने अग्निशमन विमोचन कार्य करताना उंचीवर वाऱ्याचा वेग (wind Velocity) निर्माण होत असल्यामुळे अडचणी येतात.

सर्व उंच इमारतीमध्ये अग्नि सुरक्षिततेच्या दृष्टीने संपूर्ण इमारतीमध्ये स्वयंचलित स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत. जसे स्प्रिंकलर सिस्टीम, डिटेक्टर सिस्टीम, हायड्रन्ट इत्यादी यंत्रणा कार्यान्वित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच नवीन बांधण्यात येणाऱ्या उंच इमारती मध्ये IOT Base (इंटरनेट ऑफ थिंग्स) आधारित सुरक्षा प्रणाली बसविणे बंधनकारक करण्यात आलेले असून, त्यामुळे अग्निशमन यंत्रणा सक्षम राहण्यास मदत होते.

(३) पुणे महानगरपालिकेकडील अग्निशमन दलामध्ये सद्य:स्थितीत विविध प्रकारचे ६० वाहने उपलब्ध आहेत. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेकडून २८ मीटर उंच शिडीची २ वाहने व १ हॅजमट रेस्क्यू व्हेईकल खरेदी करण्याची प्रक्रिया येत्या आर्थिक वर्षात सुरु करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी तालुक्यातील शिरसाड-अंबाडी-पडघा-वाशिद रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(८) * ६८६२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील अंबाडी वज्रेश्वरी ते पुढे शिवाजी महाराज चौक ते गणेशपुरी शिरसाड तसेच वाशिम ते शिरसाट या रस्त्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.एस.आर.डी.सी. मार्फत हा रस्ता मंजूर करून सदर रस्त्याचे कंत्राट दिलेल्या निर्मल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे स्थानिक नागरिकांना प्रवास करणे धोक्याचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी तालुक्यातील उपरोक्त रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंपनीवर तसेच अन्य संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

शिरसाड-अंबाडी-पडघा-वाशिद येथील रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मुंबई यांचेमार्फत करण्यात येत आहे. शिरसाड ते वज्रेश्वरी दरम्यान GSB DLC चे काम प्रगतीत आहे व वजेश्वरी ते शिरगाव फाटा, वाशिंद येथील PQC चे काम पूर्ण झाले असून सध्या रस्ता सुस्थितीत आहे.
(२) हे खरे नाही. या रस्त्याचे कार्यान्वयन महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाकडून करण्यात येत असून वज्रेश्वरी शिरगाव वाशिंद या भागातील लांबीत काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे. कामाचे दक्षता व गुणनियंत्रण यासाठी स्वतंत्र ऑथोरिटी इंजिनियर नेमलेले असून वेळोवेळी गुणवत्ता चाचण्या करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील काळी खण परिसरातील विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(९) * ७७२९ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील काळी खण (जि.सांगली) परिसरातील नागरिकांना सुविधा मिळाव्यात या उद्देशाने राबविण्यात आलेल्या विकासकामांमध्ये बांधकाम परवाना न घेता फूडकोर्ट गाळ्यांसाठी काम करणे, आवश्यक परवानगीशिवाय निविदा प्रक्रिया राबविणे, रस्त्यापासून नियमानुसार आवश्यक असलेले सामायिक अंतर न सोडता रस्त्याच्या जागेतच फूडकोर्ट बांधणे, अशा स्वरूपाच्या अनेक तक्रारी असून सदर प्रकल्पांमध्ये सार्वजनिक निधीचा अपव्यय झाला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महानगरपालिकेचे स्वतःचे मूलभूत कायदे, नगररचना नियम, निविदा प्रक्रिया व आर्थिक नियम अस्तित्वात असतानाही त्याचे उल्लंघन करुन खंड विकासकामे केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फूडकोर्ट गाळ्यांसाठी बांधकाम परवाना न घेता काम करणे, आवश्यक परवानगीशिवाय निविदा प्रक्रिया राबविणे, रस्त्यापासून नियमानुसार आवश्यक असलेले सामायिक अंतर न सोडता रस्त्याच्या जागेतच फूडकोर्ट बांधणे, अशा स्वरूपाच्या अनेक तक्रारी प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी तसेच संबंधित वास्तुकार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने सांगली शहरातील काळी खण परिसरामध्ये सुशोभीकरण प्रकल्प अंतर्गत लेझर शो, विद्युत रोषणाई व संगीतावर आधारित आकर्षक कारंजा करणे, अस्थाई गाळे व परिसर सुधारण्याचे काम करण्यात आले आहे. सदर कामाची निविदा स्थायी समिती ठराव क्र.११२, दिनांक ११/१०/२०२४ अन्वये रितसर मान्यता घेऊन प्रसिध्द केली होती. त्यानुसार ई-निविदा पध्दतीने निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली. सदर ठिकाणी फूड कोर्ट उभारणीसाठी अस्थायी पध्दतीचे (Movable) गाळयांचे काम करण्यात आले असून सदर गाळे हे भविष्यात आवश्यकता असल्यास इतरत्र स्थलांतरित करता येण्यासारखे आहेत. सदर अस्थायी गाळे डांबरी रस्त्याच्या बाजूच्या गटारीपासून १.५ मीटर इतक्या अंतरावर असून गाळे उभारण्यास नगररचना विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. या सर्व कामांची निविदा प्रक्रिया ही नियमानुसार राबविण्यात आली असून सदर कामांमध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली शहरातील कोट्यवधी रुपयांच्या भूखंड गैरव्यवहाराची विशेष तपास पथकाद्वारे चौकशी करण्याबाबत

**(१०) * ६६३३ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली शहरात शासकीय जमिनी बळकावून त्यावर अनधिकृत बांधकामे व व्यावसायिक इमारती उभारल्याप्रकरणी दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष तपास पथक (SIT) गठित केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूखंडात सुमारे दोन हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून, शहरातील विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्ते डावलून त्यावर अनधिकृत बांधकामे केल्याने शासकीय जमिनीचा अपहार होऊन शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली नगरपालिकेतील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून या अवैध बांधकामांना संरक्षण दिले जात असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासनाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे पुरावे गहाळ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गडचिरोली शहरात झालेल्या रुपये दोन हजार कोटी एवढ्या रकमेच्या गैरव्यवहाराची विशेष तपास पथकाद्वारे (SIT) चौकशी करुन महसुलाचे होणारे नुकसान रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे स्तरावर विशेष तपास पथक (SIT) गठित करण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर तपास पथकाने अहवाल सादर केला असून जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांना दिनांक ०५/०३/२०२६ रोजी अहवाल सादर केला आहे.

-----------------

## राज्यात विकासकांकडून घर खरेदीदारांची फसवणूक होत असल्याबाबत

**(११) * ७५०६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय खोडके, श्री.सचिन अहिर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ मे, २०१७ रोजी महारेरा स्थापन झाल्यापासून घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या, वेळेत घराचा ताबा न देणाऱ्या सुमारे १,२९१ तक्रारदारांच्या नुकसान भरपाईपोटी रुपये ७९२ कोटी एवढ्या रकमेची वसुलीचे आदेश माहे डिसेंबर, २०२५ अखेर जाहीर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घर खरेदीदारांना नुकसान भरपाईपोटी जारी केलेल्या रुपये ७९२ कोटींच्या वसुली आदेशांपैकी सुमारे २०० कोटी रुपयांची विकासकांकडून वसुली होणे शक्य नसल्याचे कारण देऊन हे आदेश संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांनी रेराकडे परत पाठविले असून महारेराचा आदेश, जिल्हाधिकारी यांची कार्यवाही यालाही विकासक जुमानत नसल्यामुळे संबंधित घर खरेदीदारांना नुकसान भरपाई कशी मिळणार याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उपनगर आणि पुणे यांसारख्या शहरांत घर खरेदीदारांची होणारी फसवणूक थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच जेव्हीपीडी (JVPD) आणि मार्वेल सारख्या मोठ्या विकासकांकडील थकबाकी वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,

(४) असल्यास, विकासक व खरेदीदार ग्राहक यांच्यामध्ये झालेल्या कराराप्रमाणे खरेदीदारांना देण्यात येणारी घरे ही करारात नमूद केल्यापेक्षा कमी क्षेत्र दिल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर असून घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित विकासकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करुन विकासकाच्या मालमत्ता जप्त करून घर खरेदीदारांना नुकसान भरपाई मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, घर खरेदीदारांना तातडीने न्याय मिळवून देण्याकरीता जे विकासक महारेराच्या नियमानुसार आकारलेल्या दंडाची रक्कम शासनाकडे जमा करत नसतील त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई

केली आहे, तसेच आगामी काळात अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून महारेराकडून विकासकांसोबत करण्यात येणाऱ्या करारामध्ये काही सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

स्थावर संपदा (नियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ च्या तरतूदीनुसार महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे प्राप्त तक्रारीवर प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येऊन तक्रारदारांच्या नुकसान भरपाईच्या अनुषंगाने विकासकांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास देण्यात आले आहेत.

तथापि, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून लिलाव यशस्वी न होणे, प्रॉपर्टी आढळुन न येणे, बॅंकेत प्रॉपर्टी गहाण/ तारण असणे, न्यायालयीन प्रकरणे/ स्थगिती इ. विविध कारणांमुळे काही आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी कळवले आहे. तथापि, या संदर्भात प्राधिकरणाने संबंधित जिल्हाधिकारी यांना आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत सविस्तर सूचना दिल्या आहेत.

(३) मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, पालघर, ठाणे, रायगड या जिल्ह्यामध्ये शासनाने जिल्हा समन्वयक अधिकारी आणि रेरा वॉरंट वसुलीसाठी त्या संबंधित जिल्ह्यातील अपर जिल्हाधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांची समर्पित महसूल वसुली अधिकारी म्हणून शासन निर्णय दिनांक २२/०४/२०२५ अन्वये नियुक्ती केली आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये JVPD जुहू विलेपार्ले विकास या नावाने विकासक रेराकडे नोंदणीकृत असून, त्यांच्याकडे असलेल्या वसुलीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडुन घेतलेल्या माहितीनुसार विकासकाच्या मालमत्तेचा लिलाव लावण्यात आला होता.तथापि, सदर प्रकरणात न्यायालयीन स्थगितीमुळे सद्य:स्थितीमध्ये वसुली होऊ शकलेली नाही.

मार्वेल ग्रुप या विकासकाविरुध्द रेरा प्राधिकरणाकडून ३३ वॉरंटव्दारे रुपये ९८ कोटी वसुलीचे आदेश देण्यात आलेले होते. त्यापैकी १० वॉरंटचे रुपये २७ कोटी वसुल करण्यात आले आहेत. मार्वेल ग्रुपचे ९ वॉरंट असणारे प्रकल्प NCLT कडे वर्ग असल्याने त्यामधील रुपये ३३ कोटी रक्कम अडकलेली आहे. उर्वरीत रुपये ३८ कोटी रक्कम वसुलीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) कराराप्रमाणे घरखरेदीदारांना देण्यात येणारी घरे ही करारात नमूद केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र दिल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर नाहीत. महारेरा प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये वेळेवर घराचा ताबा न मिळाल्यामुळे व्याज मिळण्याबाबतच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यावर महारेरा प्राधिकरणाने कायद्यातील तरतुदीनुसार आदेश पारीत केलेले आहेत.

(५) ग्राहकांसाठी देय वारंट वसुलीबाबत ज्या प्रकरणांमध्ये दंड आकारणी करण्यात येते. त्यांचे ही वसुली वारंट काढून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अन्वये वसुली करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवण्यात येते.

गृह खरेदीदारांसाठीची रक्कम आणि दंडाची रक्कम यासाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विविध नोटीसेस देणे, संपत्ती जप्त करणे, त्याचा लिलाव करणे, कसूरदार विकासकांचे बँक खात्यामधुन पैसे वळते करणे इ. मार्गाचा अवलंब केला जातो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाच्या कामामुळे वायू प्रदूषण नियंत्रणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(१२)** * **७५५७ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमएआरडीए) बीकेसीतील मेट्रो मार्ग-२ब मार्गिकेच्या कामाच्या ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महानगरपालिकेच्या वायू प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन न केल्यामुळे संबंधित कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस बजाविली असून कंत्राटदाराने खुलासा सादर केला आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदाराने केलेल्या अनियमिततेमुळे सदर प्रकल्पाचे बांधकाम थांबविण्यात आले आहे काय, तसेच आधीच विलंब झालेल्या या प्रकल्पाचे काम सुरु होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(४) असल्यास, उक्त नोटीसीच्या अनुषंगाने सदर महानगरपालिकेच्या वायू प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या मागदर्शक तत्वांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

मुंबई मेट्रो मार्ग-२ब (डि. एन. नगर ते मंडाळे) या प्रकल्पाचे स्थापत्य बांधकाम बीकेसी येथे प्रगती पथावर असून सदर प्रकल्पाचे एक कास्टिंग यार्ड आणि आरएमसी प्लांट बीकेसी येथे आहे. सदर कास्टिंग यार्ड आणि आरएमसी प्लांट चा वापर निरनिराळ्या प्रीकास्ट घटके (Precast Elements) बनविण्यासाठी व साईट वर कॉंक्रिट पुरविण्यासाठी करण्यात येतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ४ डिसेंबर, २०२५ रोजी बीकेसी येथील कास्टिंग यार्ड/बॅचिंग प्लांटला भेट दिली होती. सदर भेटीनुसार बीएमसीच्या तपासणी अहवालात नमूद करण्यात आले आहे की, दिनांक २५/१०/२०२६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बहुतेक प्रणाली-आधारित अटींचे बीकेसी कास्टिंग यार्डमध्ये पालन करण्यात आले आहे. तथापि, पाण्याची निरंतर फवारणी करणे, परिसर आच्छादित ठेवणे तसेच बांधकाम/कचरा साहित्य झाकून ठेवणे या काही अटींची पुरेशी अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याने सदर कास्टिंग यार्ड/प्लांटवरील काम बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे दिनांक २६/१२/२०२५ रोजी थांबविण्यात आले होते.

तद्नंतर, M/s. JKIL (मेट्रो कंत्राटदार) यांच्याद्वारे प्रकल्पाच्या जनरल कन्सल्टंट्स यांच्या देखरेखीखाली बृहन्मुंबई महानगरपालिकेने नोंदविलेल्या निरीक्षणांनुसार आवश्यकती पूर्तता कंत्राटदार कंपनीमार्फत केली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेला कळविण्यात आले. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०८/०१/२०२६ पासून सदर ठिकाणचे काम सुरू करण्यास परवानगी दिली असून सद्य:स्थितीत या प्रकल्पाची स्थापत्य बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे विविध मेट्रो प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली असून बहुतांश कामे हे पूर्णत्वाकडे आहेत. सद्य:स्थितीत सुरु असलेल्या विविध मेट्रो प्रकल्पासाठी नेमलेल्या कंत्राटदार व साधारण सल्लागारांस बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे निर्धारित केल्याप्रमाणे प्रदूषण नियंत्रणाबाबत योग्य त्या सूचना वेळोवेळी देण्यात येत आहेत.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका देखील वेळोवेळी सदर प्रकल्पांच्या ठिकाणी पाहणी करत असते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाहणी अंतर्गत काही त्रुटी आढळल्यास त्या वेळोवेळी दुर करण्यात येतात.

तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे सुरु असलेल्या प्रकल्पांमुळे कोणतेच प्रदूषण होऊ नये याबाबत प्राधिकरण अतिशय तत्परपणे/ निर्धारितपणे नियमांचे पालन करण्याबाबत संबंधित कंत्राटदार व साधारण सल्लागार यांना वेळोवेळी सूचना देत आहे. सदर सूचनांचे पालन न झाल्यास प्राधिकरण/ साधारण सल्लागारातर्फे संबंधित कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(१३)** * **६९१५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिकेची मंजुरी मिळालेल्या बहुतांश इमारती या अनधिकृत असून स्थानिक रहिवाशांना महानगरपालिकेतर्फे नोटीसा देण्यात आल्यामुळे हजारो रहिवाशी कुटुंबे बेघर होण्याची परिस्थिती उद्भवली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोळींज पाटील आळी, विरार पश्चिम येथील VP ५३६७, मोरेश्वर हाईट्स व त्यालगत इमारतींना बेकायदेशीर परवानगी देण्यात आली असून विकासकावर रेरामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत इमारतींसाठी महानगरपालिकेतील कार्यरत आयुक्त सचिव, नगररचनाकार व ठेका अभियंता, नगररचना विभाग यांनी तेथील विकासकांशी संगनमत करून विकास आराखड्यातील नियमांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आरक्षित जागांवरील बांधकामास तसेच मंजूर चटईक्षेत्रापेक्षा वाढीव बांधकामास बेकादेशीरपणे दिलेल्या परवानग्या आणि अनधिकृत बांधकाम यांमुळे महानगरपालिकेकडून या इमारती निष्कासित करण्याची कारवाई केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मौ.दिवाणमान सर्वे क्र.१९२ हिस्सा क्र.४ या ठिकाणी अनधिकृत बांधकामास परवानगी देवून नैसर्गिक नाला बुजविण्यात आलेला असून याबाबतची तक्रार तेथील स्थानिकांनी तहसिल कार्यालयात वारंवार केलेली असून यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रशासनामार्फत एसआयटी नेमून सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषी अधिकारी व विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

मोरेश्वर हाईटस इमारतीला UDCPR २०२० नियमावलीनुसार महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. संबंधित विकासकाने इमारतीचे बांधकाम वेळेवर पूर्ण न केल्यामुळे घर खरेदी करणाऱ्या नागरिकांनी रेरा प्राधिकरणामध्ये तक्रार केली आहे. त्यानुसार रेरा मार्फत विकासकाविरुध्द आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

वसई विरार शहर महानगरलिका क्षेत्रातील बांधकाम परवानगी ही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ तसेच, एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० मधील तरतुदीनुसार तांत्रिक छाननी करुन संगणकीय प्रणाली जसे की BPMS व Soft tech (Auto DCR) द्वारे ऑनलाईन पध्दती देण्यात येते.

(४) हे खरे नाही.

आरक्षित जागांवरील बांधकामास तसेच मंजूर चटई क्षेत्रापेक्षा वाढीव बांधकामास महानगरपालिकेकडून बेकायदेशीररित्या परवानग्या देण्यात आलेल्या नाहीत. तसेच आरक्षित जागेवरील अनधिकृत बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३ व ५४ अन्वये नोटीसा बजाविण्यात येतात व नियमातील तरतुदीनुसार कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करण्यात येते.

(५) होय हे खरे आहे.

श्रीम. ललीता सुर्यवंशी यांची दिनांक १६ जुलै, २०२५ व दिनांक ३० जुलै, २०२५ रोजीची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झालेली असून, त्यासंबधी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली. तसेच मंडळ अधिकारी यांचे सदर तक्रारी नुसार नैसर्गिक नाल्यासंबंधी दोन अहवाल प्राप्त झाले असून, दोन्ही अहवालामध्ये तफावत आढळून आलेली आहे. याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना सदर प्रकरण पडताळणीकरीता पाठविण्यात आले आहे. तसेच, दिनांक ०९ जानेवारी, २०२६ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये बांधकाम परवानगी रद्द करण्यात आलेली आहे.

विकासकाने त्याविरोधात मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मा.न्यायालयाच्या निर्णयाचे अनुषंगाने पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## नाशिक कुंभमेळा बाह्यवळण राज्य मार्गासाठी केलेल्या भूसंपादनाचा शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत

**(१४) * ७०६८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक कुंभमेळा बाह्यवळण राज्य मार्गासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला न देता सुरू करण्यात आलेल्या कामाविरोधात चिंचोली व वडगाव पिंगळा (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांनी साखळी उपोषण सुरु केले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबदल्याशिवाय जमीन देणार नसल्याचा ठाम निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला असून चिंचोली फाटा ते पांढुर्ली या बाह्यवळण रस्त्यामुळे (ता.सिन्नर, जि.नाशिक) बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेली घरे, विहिरी, गोठे, पॉलिहाऊस, कुपनलिका, दुकाने व झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्य गावांप्रमाणे चिंचोली व वडगाव पिंगळा येथील शेतकऱ्यांनाही रीतसर जमीन खरेदी करून योग्य मोबदला द्यावा ही शेतकऱ्यांनी केलेली मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे.

तथापि, शासनाच्या दिनांक २५/०३/१९५७ च्या व महाराष्ट्र प्रादशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ शासन निर्णय दिनांक ०५/०८/२०१९ नुसार ३० मीटर रुंदीतच प्रस्तावित काम होत आहे त्यामुळे कामासाठी कोणतेही अतिरिक्त किंवा नव्याने भूसंपादन प्रस्तावित नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. सदरचे प्रस्तावित काम सुरू करण्यास शेतकऱ्यांनी विरोध व्यक्त केला त्यामुळे सद्य:स्थितीत काम बंद आहे.

तथापि, प्रस्तावित काम एकूण २० मीटर रुंदी मध्येच प्रस्तावित आहे. या कामामुळे चिंचोली ते पांढुरली या बाह्यवळण रस्त्याच्या लांबी मधील कोणत्याही शेतकऱ्याची घरे, विहिरी, गोठे, पॉलिहाऊस, कुपनलिका, दुकाने इत्यादीचे नुकसान होत नाही.

(३) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या शा.नि. क्र. संकीर्ण ०५/२०१०/प्र.क. १११/अ-२ दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयान्वये ‘शासनाने २० वर्षापूर्वी ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला २० वर्षाच्या विलंबाने मागणी करण्याचा हक्क राहत नसल्याने शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याची मागणी ग्राह्य नाही. तरी सदरबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/१२/२०२५ व दिनांक १८/०२/२०२६ रोजी मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत मा.महसूल मंत्री यांनी जमिनीचा मोबदला आणि नुकसान भरपाईबाबत कायदेशीर तरतुदी तपासून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर फेरीवाल्यांचे वाढते अतिक्रमण रोखण्याबाबत

**(१५) * ७२५९ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत संपूर्ण रस्त्यांवर फेरीवाल्यानी अतिक्रमण केले असून ही बाब विविध संघटनांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली असून अनेक फेरीवाले रस्त्यावर सिलेंडरसह गॅस शेगडी वा अत्यंत धोकादायक उपकरणांचा वापर करित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महानगरपालिका परिसरातील रस्ता आणि पदपथ यावर अनधिकृत फेरीवाले फळे अन् भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतात, त्यामुळे वाहनचालक अन् पादचारी यांना अडचण येते, महानगरपालिकेकडून तात्पुरती कारवाई होते परंतु दुसऱ्याच दिवशी पुन्हा अतिक्रमण केले जात असल्याने वाहतूक कोंडी वाढून अपघातांचा धोका निर्माण झाला असून मागील २ वर्षांत फेरीवाल्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी यांचे फेरीवाल्यांशी आर्थिक हितसंबंध असल्यामुळे बेकायदेशीर फेरीवाल्यांना संरक्षण मिळत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी महानगरपालिका आयुक्तांकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अतिक्रमणांमुळे स्थानिक अधिकृत विक्रेत्यांच्या व्यवसायावरही विपरीत परिणाम होत असून यावर 'महानगरपालिकेने कायमस्वरूपी उपाययोजना करून कठोर कारवाई करावी', अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाल्यांना ठाणे महानगरपालिकेमार्फत हटविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. तथापि, याबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आदेशात प्रतिबंधित केलेल्या महानगरपालिका किंवा अन्य मार्केट व रेल्वे स्टेशन पासून १५० मीटर तसेच पूजा स्थळ, पवित्र मंदिर, शैक्षणिक संस्था व रुग्णालयापासून १०० मीटरच्या परिसरात व फुटब्रीज आणि ओव्हरब्रीज या ठिकाणी व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत दैनंदिन दोन सत्रात फेरीवाल्यांवर नियमित कारवाई करण्यात येते.

तसेच पदपथ हे फेरीवाला मुक्त ठेवणेसाठी प्रभाग स्तरावर वेळोवेळी महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात येते. माहे एप्रिल, २०२५ ते माहे फेब्रुवारी, २०२६ या कालावधीमध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ३४१० फेरीवाल्यांवर ठाणे महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आली असून, त्यापैकी २७१० फेरीवाल्यांवर दंडात्मक कारवाई करुन त्यांचेकडून रक्कम रुपये २९,३९,००९/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ७०० हातगाडी/ टपऱ्या तोडून नष्ट करण्यात आलेल्या आहेत.

राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये फेरीवाला धोरण राबविण्याचे अंतिम टप्प्यात आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांलगत असलेल्या बहुतांश पदपथांचे ठिकाणी संरक्षक जाळ्या (ग्रील) बसविण्यात आल्या आहेत. शासन तसेच मा.न्यायालयाचे निर्देशाचे अनुषंगाने महानगरपालिका व पोलीस प्रशासन यांचेकडून वेळोवेळी संयुक्त विद्यमाने कारवाई करण्यात येते.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील पदपथ हे विविध प्रकल्पांतर्गत विकसित व सुशोभित करण्यात आले आहेत. पादचारी धोरणांतर्गत ठाणे शहरामध्ये पादचाऱ्यांसाठी सुरक्षा, सोयीस्कर व सुलभ पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. याअंतर्गत रस्ते नियोजन, वाहतूक व्यवस्था, पादचारी मार्ग, झेब्रा क्रॉसिंग, दिव्यांग व्यक्तींसाठी सुविधा इत्यादींना प्राधान्य देण्यात येत आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे पादचारी सुरक्षा या संदर्भात दाखल रिट याचिका क्र.२९५/२०१२ श्री.एस. राजासीकरण विरुध्द केंद्र शासन व इतर मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने नगरविकास विभागाने दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ च्या परिपत्रकान्वये महानगरपालिकांनी त्यांच्या क्षेत्रातील पदपथ व पादचारी मार्गावरील अतिक्रमण हटविण्यासाठी संरचित कृती आराखडा तयार करावा. व त्याअनुषंगाने कायद्यातील तरतुदीनुसार अतिक्रमणाचे निर्मूलन करण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील न्यू माहीम मनपा शाळेचे स्थलांतरण झाल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१६)** * **७७९९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील न्यू माहीम म्युनिसिपल स्कूलची (न्यू माहीम शाळा) इमारत संरचनात्मक तपासणीत धोकादायक (C-१ श्रेणी) आढळल्यामुळे, त्यातील सुमारे ३५० ते ४०० विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या कारणास्तव तात्पुरते माहीम येथील पॅराडाईज सिनेमासमोरील कापड बाजार एसआरए (SRA) निवासी इमारतीतील मोकळ्या जागेत हलवण्यात आले असून, ही शाळा सध्या तिथे भरवली जात असल्याची बाब माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्थलांतरांमुळे विद्यार्थ्यांना दररोज धारावीहून दीड तास पायी प्रवास करावा लागत असल्याने ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे तसेच सदर शाळा इमारतीमध्ये अनेक गैरसोयी असल्याने पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, दप्तर ठेवण्याची सोय आदी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने विद्यार्थी त्रस्त झाले आहेत शाळांमध्ये मुलांना खेळण्यासाठी मैदानही उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही वर्षांपूर्वी नूतनीकरण केलेल्या इमारतीला धोकादायक घोषित केल्यामुळे पुनर्विकासाबाबत पालक व स्थानिकांनी यावर संभ्रम व्यक्त केला असून शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित राहावे याकरीता शाळेच्या पाडकामास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असलेला प्रतिकूल परिणाम लक्षात घेता शासनाने मुंबई महापालिकेला शाळांच्या पुनर्बांधणीला तातडीने मंजुरी देऊन केवळ शैक्षणिक वापरासाठीच इमारत उभारण्याबाबत स्पष्ट व लेखी निर्देश देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
कापड बाजार शाळेचे अंतर न्यु माहिम मनपा शाळेपासून अंदाजे १ किमी इतके आहे. सदर शाळेकरीता धारावी परिसरातून येणारे बहुतांशी विद्यार्थी हे मेट्रो प्रवासाचा पर्याय वापरतात.
कापड बाजार येथील शालेय इमारतीत क्रिंडागणाव्यतिरिक्त इतर शालेय सुविधा उपलब्ध आहेत. तसेच या शाळेतील विद्यार्थ्यांना नजीकच्या आर.सी.माहिम मनपा शाळेमध्ये खेळाकरीता क्रीडांगण उपलब्ध आहे.
(३) न्यु माहिम मनपा शाळा न पाडण्याबाबत काही पालकांनी शाळा प्रशासनास विनंती केली होती.
(४) न्यू माहिम शाळेच्या पुनर्बांधणी इमारतीच्या आराखड्यांना बांधकाम मंजुरी प्राप्त करण्याची प्रक्रिया महानगरपालिकास्तरावर अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अभियंत्यांच्या बदली प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(१७) * ७८७३ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणावर अनागोंदी कारभार सुरु असून १५६ अभियंत्यांच्या बदलीत अनियमितता झाल्याचा आरोप तसेच याप्रकरणी विशेष तपास पथक (एसआयटी) नेमून चौकशी करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधीं यांनी माहे ऑक्टो.२०२५ मध्ये वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेत अभियंता पदांतील वेगवेगळया वर्गातील जवळपास ६७४ पदे रिक्त असून ती भरली जात नाहीत, तसेंच पेपरफुटीमुळे परीक्षा प्रक्रिया पुन्हा राबविण्यात आली असून या प्रकरणी दोषींवर कारवाई होणेबाबत देखील मा.लोकप्रतिनिधीं यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येते आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये १२२ दुय्यम अभियंता (स्थापत्य), ३४ सहायक अभियंता (स्थापत्य) व ७ सहायक अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांच्या बदलीस स्थगिती दिलेली आहे.

बृहन्मुंबई महापालिकेमार्फत सरळसेवा भरतीअंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) संवर्गाची २५० पदे, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गाची १३० पदे, दुय्यम अभियंता (स्थापत्य) संवर्गाची २३३ पदे, तसेच दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गाची ७७ रिक्त पदे याप्रमाणे एकूण ६९० पदे भरण्याकरीता दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी जाहिरात देण्यात आली. विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सद्य:स्थितीत दुय्यम अभियंता (स्थापत्य) संवर्गात १७५ तसेच दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) संवर्गात ३८ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. उर्वरित उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची प्रशासकीय कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

कनिष्ठ अभियंता संवर्गाच्या जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हतेच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाकडे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यास्तव या संवर्गाच्या परीक्षेचा निकाल अद्याप प्रसिध्द करण्यात आलेला नाही.

भरती प्रक्रियेमध्ये पेपरफुटीमुळे परीक्षा प्रक्रिया पुन्हा राबविण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) नगरपरिषदेच्या सांस्कृतिक केंद्राचे (नाट्यगृह) काम प्रलंबित असल्याबाबत

**(१८)** * **७९६४ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी नगरपरिषद (जि.वर्धा) करीता नाट्यगृह व वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ मध्ये रूपये ४.०० कोटी एवढ्या रकमेचा निधी मंजूर करण्यात येऊन नगरपरिषद वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेंतर्गत सन २०२२-२०२३ या वर्षी नगरपरिषद हद्दीतील सर्वे क्र २८९ मधील ०.२१ हे आर जागेवर सांस्कृतिक केंद्र (नाट्यगृह) बांधकामासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनासाठी रुपये १,५५,६१००० /-एवढ्या रक्कमेचा निधी मंजूर करून भूसंपादन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद आर्वी (जि.वर्धा) येथे शासनाने मंजूर केलेल्या सांस्कृतिक केंद्र (नाट्यगृह) प्रकल्पान्वये शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी मुख्याधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (वि.प.स.) यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक ३१/०१/२०२६ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सन २०१८-२०१९ पासून प्रलंबित असलेल्या सांस्कृतिक केंद्र (नाट्यगृह) बांधकामाची निविदा करणे बाबत नगरपरिषद आर्वी (जि.वर्धा) यांच्याकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) आर्वी नगरपरिषदेच्या उत्पन्नात भर पडण्यासाठी नाट्यगृह ऐवजी व्यापारी संकुल बांधकाम करण्याबाबत प्रशासकीय सभा दिनांक ०१/०२/२०२४ ठराव क्र.१ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार मुख्याधिकारी, आर्वी नगरपरिषद यांच्या दिनांक ०२/०२/२०२४ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मौजा आर्वी येथील सर्व्हे क्र.२८९ मधील आरक्षण क्र.५१-सांस्कृतिक केंद्र खालील २१००.०० चौ.मी. जागेवर आरक्षण क्र.५१ सांस्कृतिक केंद्र ऐवजी "वाणिज्यीक" वापर शासनाने अनुज्ञेय केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुंटूर (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील स्वस्त धान्य दुकानातून लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप होत असल्याबाबत

**(१९) * ७९९४ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंटूर (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील तसेच परिसरातील स्वस्त धान्य दुकानातून लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा तांदूळ, गहू व ज्वारीचे वाटप होत असून लाभार्थ्यांना अल्पदरात देण्यात येणारे रेशन खाण्यायोग्य नसून त्यात किडे, अळया तसेच कुजलेले दाणे आढळून येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांनी याबाबत वारंवार तालुका पुरवठा अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने चौकशी करुन लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवठा करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर शहरातील पाणीपुरवठा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(२०) * ८०८६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर शहराच्या पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवणे आणि एमआयडीसीसह संपूर्ण शहराला सुरळीत पाणीपुरवठा करणे याकरीता सुमारे सात वर्षांपूर्वी तत्कालिन मुख्यमंत्री यांनी ४९२ कोटी रुपयांच्या सुधारित फेज-टू (Phase-II) पाणीपुरवठा योजनेस मंजुरी दिली होती परंतु आजतागायत देखील सदर निधी खर्च होऊनही शहराला नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या सदर पाणीपुरवठा योजनेंतर्गत जलशुद्धीकरण केंद्र, पाईपलाईन, टाक्या व इतर पायाभूत सुविधा अपूर्ण राहिल्यामुळे शहरातील अनेक भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण होत असून नागरिकांना रोज पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, योजनेसाठी खर्च करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपेक्षित उपयोग न झाल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत असून नियोजनातील त्रुटी, कामातील दिरंगाई किंवा संबंधित यंत्रणांची निष्काळजीपणा यास जबाबदार धरले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील सापडी, केडगाव व इतर भागांमध्ये प्रस्तावित पाणीपुरवठा व इतर विकासकामांना निधीअभावी किंवा अपुऱ्या अंमलबजावणीमुळे विलंब होत असल्याने नागरिकांच्या मूलभूत सुविधा प्रभावित होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अहिल्यानगर शहरातील पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीत झालेल्या दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, तसेच शहराला नियमित, शुध्द व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी शासन सुधारित व कालबध्द कृती आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) केंद्र पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत अहिल्यानगर शहराच्या रुपये ११६.०७ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास सन २०१० मध्ये मंजुरी करण्यात आली होती. सदर योजनेमध्ये उंच पाण्याच्या टाक्या(७), गुरुत्ववाहिनी अंथरणे, पंपिंग मशीनरी, वितरण व्यवस्था आणि स्काडा इ. उपांगांचा समावेश होता.सदरील योजनेचे काम पूर्ण झालेले आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत अभियानंतर्गत रुपये १३७ कोटी किंमतीच्या प्रकल्पास सन २०१७ मध्ये मंजुरी प्रदान करण्यात आली होती. सदर योजनेमध्ये अशुध्द पाण्याची रायझिंग मेन, रॉ वॉटर ग्रॅव्हिटी मेन, जलशुद्धीकरण केंद्र, जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती, शुध्द पाण्याची रायझिंग मेन इ. उपांगांचा समावेश होता.सदरील प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून प्रकल्प सन माहे मे, २०२३ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे आणि शहरास सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(२) व (३) अहिल्यानगर शहरातील यापूर्वी मंजूर दोन्ही प्रकल्पांची कामे पूर्ण झाली असून प्रकल्पांचे लोकार्पण झालेले असून सद्य:स्थितीस शहरास सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येत असून शासकीय निधीचा कोणताही अपव्यय झालेला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) (५) व (६) अहिल्यानगर शहरातील दोन योजना पूर्ण होऊन शहरास पाणीपुरवठा होत आहे. तथापि, वाढती गरज विचारात घेऊन महानगरपालिकेने नव्याने प्रस्तावित केलेल्या रुपये ४७५.९६ कोटी प्रकल्प किंमतीच्या प्रस्तावाबाबत शासन स्तरावरुन तपासणी केली असून सुयोग्य नियोजन व आवश्यकता व स्वनिधीचे नियोजन विचारात घेऊन प्रस्ताव फेरसादर करण्याचे निर्देश महानगरपालिकेस देण्यात आलेले आहेत.

----------------

## ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदरला जोडणाऱ्या घोडबंदर मार्गाच्या रुंदीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * ८३२२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदरला जोडणाऱ्या महत्त्वाच्या घोडबंदर मार्गाच्या (जि.ठाणे) रुंदीकरणातील वनविभागाच्या अडचणी तातडीने दूर करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिल्याची माहिती माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या मार्गावरील वन विभागाची 'ना-हरकत प्रमाणपत्र' (NOC) मिळण्यात येत असलेल्या अडचणींमुळे कामाला गती मिळण्यात विलंब होत असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यास ठाणे-घोडबंदर, वसई-विरार आणि मीरा-भाईंदरला जोडणारा महत्त्वाचा मार्ग वेगवान होईल आणि प्रवासाचा वेळ वाचेल याकरीता ठाणे जिल्हा प्रशासनाने या कामांमधील वन विभागाचे अडथळे दूर करण्यासाठी विशेष समन्वय अधिकारी नेमण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गायमुख ते फाउंटन हॉटेल आणि फाउंटन ते घोडबंदर या टप्प्यांवरील रुंदीकरणाची कामे प्रलंबित वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी हाती घेण्यात आली असून यात गायमुख ते फाउंटन हॉटेल दरम्यान उन्नत मार्ग (Elevated Road) आणि भुयारी मार्ग (Tunnel) तयार करण्यात येणार असून, एमएमआरडीए (MMRDA) द्वारे या प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, गायमुख ते फाउंटन हॉटेल आणि फाउंटन ते घोडबंदर या दोनही टप्प्यांवरील रुंदीकरणाची कामे परवानग्यांच्या विलंबामुळे प्रलंबितअसून याचा परिणाम दररोज हजारो वाहनचालकांना बसत असून त्यातून अपघातही होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, घोडबंदर मार्गावरुन अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून या मार्गांचे रुंदीकरण अत्यावश्यक असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय हे खरे आहे.

(२) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील गायमुख ते फाउंटन हॉटेल दरम्यानचा रस्ताच्या रुंदीकरणासंबंधीचा प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत वन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या संबंधिचा ऑनलाईन प्रस्ताव दिनांक ०३/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. वन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत पाठपुरावा सुरु आहे.

(३), (४), (५) व (६) ठाणे घोडबंदर रस्त्यावरील बाळकुम ते फाउंटन हॉटेल दरम्यान होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दितील कापुरबावडी ते गायमुख दरम्यानच्या अस्तित्वातील रस्त्याचे रुंदीकरणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असून हे आता पर्यंत ६५%

पूर्ण झालेले आहे. तसेच ठाणे घोडबंदर रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बाळकुम ते गायमुख असा ठाणे किनारी रस्त्याचे काम प्रगतीत असून आतापर्यंत २२% काम झालेले आहे.

त्याचबरोबर मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील गायमुख ते फाउंटन हॉटेल दरम्यानच्या घाट रस्ता मंजूर विकास योजनेनुसार ३० मीटर रुंदीचा रस्ता ६० मी रुंदीकरण करण्याची कार्यवाही मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. तथापि, या मार्गाला पर्यायी मार्ग म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत गायमुख जंक्शन ते फाउंटन हॉटेल पर्यंत भूयारी मार्ग प्रकल्प (ठाणे किनारी रस्ता टप्पा-२) हाती घेण्यात आलेला आहे. तसेच फाउंटन हॉटेल ते भाईंदर असा उन्नत मार्ग प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. हे रस्ते प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ठाणे घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

-----------------

## तोंडोली गाव ते खेराडे विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२२) * ८४४८ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोंडोली गाव ते खेराडे विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील वर्षानुवर्ष दुर्लक्षित राहिलेल्या ग्रामीण रस्त्यावर सर्वत्र मोठमोठे खड्डे, डांबराचा थर पूर्णपणे निघाला असून स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी वारंवार लेखी व तोंडी तक्रारी देऊनही स्थानिक प्रशासन कोणतीही कार्यवाही करत नसल्याने येथील ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक प्रशासनास माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील शेतकरी, महिला, शाळकरी विद्यार्थी, नोकरदार वर्ग, रुग्णवाहिका, वाहन धारक यांना अत्यंत कठीण परिस्थितीत या महत्त्वाच्या ग्रामीण रस्त्याने सातत्याने मार्गक्रमण करावे लागत असून या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे याठिकाणी अपघातांची आणि गंभीर दुखापतग्रस्तांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक प्रशासनाकडून सदर रस्त्याचे पक्के बांधकाम करण्यासाठी साधारण किती रकमेचा निधी आजतागायत मंजूर केला गेला आहे,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच या रस्त्याच्या बांधकाम प्रक्रियेस विलंब करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

आंदोलन करणेबाबत लेखी निवेदन प्राप्त नाही. तथापि, सदर रस्त्याबाबत तोंडी तक्रारी प्राप्त आहेत. सांगली जिल्ह्यातील कडेगांव तालुक्यातील पाचुद (जिल्हा हद्द) शाळगाव बेलवडे तोंडोली खेराडे विटा तुपेवाडी हणमांतवडिये रस्ता या विभागाचा असून सदर लांबीत वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत खड्डे भरणेत येऊन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे व इतर अनुषंगिक कामे या मंडळाअंतर्गत करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाने पोलीस स्टेशन कडेगाव यांचे कार्यालयाकडून मिळवलेल्या माहिती नुसार या रस्त्यावर झालेल्या अपघातांची संख्या “निरंक” आहे.
(३) सदर रस्त्याच्या साखळी क्र.०/००० ते ४/२००, ५/२०० ते ८/५०० या लांबीच्या कामाकरीता फेब्रुवारी, २०२१ च्या अर्थसंकल्पामध्ये रुपये ६.०० कोटी इतक्या रकमेचे काम मंजूर होते तसेच साखळी क्र.१८/०० ते २०/०० या लांबीच्या कामाकरीता डिसेंबर, २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये रुपये २.०० कोटी इतक्या रकमेचे काम मंजूर होते. सदर दोन्ही कामे पूर्ण करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील कचरा संकलन वाहतूक करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२३) * ८४६१ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील कचरा संकलनाची जबाबदारी सन २०१९ मध्ये हैद्राबाद येथील पी.गोपीनाथ रेड्डी या कंपनीवर सोपविण्यात आली असून उक्त कचरा संकलन करणाऱ्या रेड्डी कंपनीच्या घंटागाड्या नागरी वसाहतीत येत नसल्याने नागरिक कचरा खुल्या जागांवर, दुभाजकात, रस्त्याच्या कडेला, हरित पट्ट्यात  टाकत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेड्डी कंपनीला १००% डोअर-टू-डोअर संकलन करण्यात अपयश आले असून सीसीटीव्ही तपासणीत घंटागाड्या अनियमित असल्याचे आढळले कचरा संकलनात घोळ आणि निष्काळजीपणामुळे कंपनीला दंड ठोठावण्यात आला असून, उक्त रेड्डी कंपनीचा ७ वर्षाचा करार संपुष्टात येत असल्याने नवीन कंपनीची निवड करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेड्डी कंपनीच्या अकार्यक्षमतेनंतर शहरातील कचऱ्याचे संकलन व वाहतूक करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर मनपा घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत फेब्रुवारी २०१९ मध्ये सात वर्षाकरीता कचरा संकलन वाहतूक या कामासाठी पी.गोपीनाथ रेड्डी या एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती.
छत्रपती संभाजीनगर शहरातील वाढती लोकसंख्या व विस्तार लक्षात घेता, कचरा संकलन वाहतूक या कामासाठी घंटागाड्यांची संख्या अपुरी पडत आहे.
(२) हे खरे आहे.

नागरी वसाहतीत नियमित घंटागाडी जात नसल्याने महानगरपालिकेकडून Integrated Command and Control Centre (ICCC) मार्फत पी.गोपीनाथ रेड्डी कंपनीवर दंडात्मक कार्यवाही करुन सदरील दंड एजन्सीच्या मासिक देयकातून कपात करण्यात येतो. गेल्या वर्षभरात महानगरपालिकेकडून सदर कंपनीला एकूण ३०.०० लक्ष रुपये दंड लावण्यात आला आहे. तसेच रस्त्यावर

कचरा टाकणाऱ्या नागरीकांवर नागरिक मित्र पथकाद्वारे दंडात्मक कार्यवाही करण्यात येते. सदर कंपनीचा कार्यकाळ जानेवारी २०२६ मध्ये संपुष्टात आल्याने नवीन एजन्सीची नियुक्तीचे काम महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बेस्ट उपक्रमातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उपदानासह अन्य लाभांची थकबाकी मिळाली नसल्याबाबत

**(२४) * ८५१४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट) मधील अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या देय असलेली ग्रॅच्युईटी, रजेचे रोखीकरण आणि अन्य निवृत्ती लाभांची रक्कम प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेस्ट उपक्रमातून २०२२ पासून सेवानिवृत्त झालेल्या सुमारे ४५०० कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटी, रजेचे रोखीकरण, कोविड भत्ता आणि अन्य देणी या थकबाकीची रक्कम ७०० कोटी रुपयांहून अधिक असून सदर थकबाकी मिळावी याकरीता संबंधितांनी शासनाकडे वारंवार लेखी पत्रव्यवहार आंदोलने करुनही शासनाकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेवानिवृत्तनंतर ३० दिवसांत ग्रॅच्युइटीचे (Gratuity) पैसे कामगारांना मिळायला हवे होते. मात्र चार वर्षे झाली तरी बेस्ट उपक्रमातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांची हक्काची ग्रॅच्युइटी रक्कम मिळालेली नाही, सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना आपल्या हक्काच्या पैशांसाठी बेस्ट मुख्यालयात पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती बिकट असून मुंबई महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या अनुदानावर उपक्रमाचा कारभार चालवला जात असून बेस्ट प्रशासनास महानगरपालिकेकडून निधी मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट) मधील निवृत्त होणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे थकबाकीची रक्कमही वाढू लागली असून आतापर्यंत थकबाकी न मिळालेल्या सुमारे १०० ते १५० निवृत्त कर्मचाऱ्यांचे निधन झाले असून, सदर गंभीर बाबीची शासनाने दखल घेऊन मुंबईतील बेस्ट उपक्रमातील निवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित थकबाकी लवकरात लवकर अदा करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) बेस्ट उपक्रमातून दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते माहे सप्टेंबर, २०२२ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झालेल्या ९,९४४ कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी व अंतिम देयके (विविध भत्त्यांसह) संपूर्ण रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

दिनांक ३१ मे, २०२४ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ९१३/२०२४ मध्ये दिलेल्या आदेशानुसार थकित ग्रॅच्युईटी व अंतिम देयकांपैकी (विविध भत्त्यांची रक्कम) ६२.६२% इतकी म्हणजे रुपये ६११.६६ कोटी रक्कम अदा करण्यात आलेली असून उर्वरीत ३७.४१% इतकी म्हणजे रुपये ३६५.४२ कोटी रक्कम अदा करण्याचे प्रलंबित आहेत. तसेच दिनांक ०१ जून, २०२४ पासून माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटी व अंतिम देयके रुपये ९८७.२६ कोटी प्रलंबित आहेत.

(४) सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीमधील बेस्ट उपक्रमाची एकूण तूट रुपये ५६८०.४७ कोटी असून बेस्ट उपक्रमाचा दिनांक ३१ मार्च,२०२५ पर्यंत एकूण प्रत्यक्ष संकलित तोटा रुपये ६१२६.५२ कोटी इतका आहे.

मागील पाच वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बेस्ट उपक्रमास एकूण रुपये ६५९८.४३ कोटी अनुदान प्राप्त झाले आहे. सन २०२५-२६ मध्ये बेस्ट उपक्रमाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे रुपये २१३२.५२ कोटीची मागणी केली होती व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बेस्ट उपक्रमास रुपये १००० कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

बेस्ट उपक्रमाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची प्रलंबित ग्रॅच्युइटी व अंतिम देयकांची एकूण रक्कम रुपये १३५२.६८ कोटी इतकी आहे. सदर निधी अदा करण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे बेस्ट उपक्रमाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे वेळोवेळी अतिरिक्त अनुदानाची मागणी केली आहे.

(५) बेस्ट उपक्रमामधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची कागदपत्रे तपासून निधीच्या उपलब्धतेनुसार ग्रॅच्युईटी व अंतिम देयके अदा केली जातात. ज्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अद्याप ग्रॅच्युइटी व अंतिम देयके मिळालेले नाहीत, अशा कर्मचाऱ्यांना आजारपण, विवाह, उच्च शिक्षण इत्यादीसाठी तातडीने रुपये २.०० लाख ते रुपये ५.०० लाख इतकी रक्कम त्यांच्या उपदानातून देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करून देण्याबाबत

**(२५) * ७६४८ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने विद्यार्थ्यांसाठी सुमारे ९८३७९ टॅब उपकरणांची खरेदी करून त्यासाठी अंदाजे ४५ कोटी रुपयांची तरतूद केली असतानाही अद्यापही अनेक विद्यार्थ्यांना टॅब देण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतून प्रवेश घेणारे बहुसंख्य विद्यार्थी हे आर्थिदृष्ट्या दुर्बल समाजघटकांतून आलेले असून या विद्यार्थ्यांना कुटुंबाच्या रोजच्या गरजा भागविण्यासाठी हातभार लावावा लागत असून अशा परिस्थितीत शिक्षणाचा खर्च कुटुंबास परवडणारा नसल्याची बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी टॅबची गरज असून त्यांना स्वतःच्या पैशांनी टॅब खरेदी करणे देखील परवडणारे नसल्यामुळे पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना टॅब खरेदी करून त्याचे वाटप करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, टॅब खरेदी प्रक्रिया पूर्ण होऊनही वितरणात विलंब, प्रशासकीय अडथळे व नियोजनाच्या अभावामुळे डिजिटल शिक्षणाचा लाभ अपेक्षित घटकांपर्यंत पोहोचत नसून उपरोक्त प्रकरणी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर जबाबदारी निश्चित करुन महानगरपालिकेच्या शाळांना विद्यार्थ्यांच्या वापराकरीता टॅब उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करून देण्याचे सन २०१५-१६ मध्ये निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०१६ ते २०२५ या कालावधीत टप्याटप्याने एकूण ७८,२६७ इतके टॅब्स निविदाद्वारे खरेदी करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर ७८,२६७ टॅब्स खरेदीसाठी रुपये १०६,१७,७८,७०४/- इतका निधी खर्च करण्यात आला आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेमधील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्यात येते. तसेच शाळेमधील विद्यार्थ्यांना शालेपयोगी वस्तुदेखील मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात.
(३) हे खरे आहे.
त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करून देण्याचे सन २०१५-१६ मध्ये निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०१६ ते २०२५ या कालावधीत टप्याटप्याने एकूण ७८,२६७ इतके टॅब्स निविदाद्वारे खरेदी करुन विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यात धान खरेदी संस्थांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२६) * ७१०७ श्री.अमित गोरखे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात धान खरेदीमध्ये बनावट शेतकरी दाखवून कोट्यवधी रुपयांच्या बोनसच्या रकमेत गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले असून यात अनेक धान खरेदी संस्था आणि त्यांचे संचालक दोषी आढळले असून त्यांच्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान खरेदी संस्था व त्यांच्या संचालकांवर कायदेशीर कारवाई करुन कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी शेतकरी एकता मंचने तहसिलदार यांना निवेदन देऊन दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजीपासून तहसिल कार्यालय समोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घोटाळयामुळे खऱ्या शेतकऱ्यांच्या बोनसच्या हक्कावर गदा आली असून यात अनेक धान खरेदी संस्था आणि त्यांचे संचालक यांचा समावेश असून, यात सामील असलेल्या काही राईस मिलर्सना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे काय, सदर धान खरेदीत दोषी आढळलेल्या सर्व धान खरेदी केंद्र चालक व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने तसेच धान खरेदी केंदांचे ऑडीट करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यामधील १३ खरेदी संस्थांकडून रुपये २.०९ कोटीची पणन हंगाम २०२४-२५ मधील प्रोत्साहनपर राशीत अनियमितता झाली आहे. या संस्थावर अभिकर्ता संस्थेकडून आर्थिक दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच सर्व संस्थांना पुढील ३ वर्षे काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत. १३ पैकी ११ खरेदी संस्थांकडून रुपये १.७९ कोटी वसूल करण्यात आले आहेत. रक्कम वसूल न झालेल्या २ खरेदी संस्थांवर अभिकर्ता संस्थेकडुन गुन्हे नोंद केले आहेत.
(२) यानुषंगाने तहसिलदार, सालकेसा यांच्याकडे निवदेन प्राप्त आहे.
(३) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान/भरडधान्य (ज्वारी, बाजरी, मका, रागी) खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता, प्रामाणिकता, लाभार्थी शेतकऱ्यांना वेळेत व योग्य मोबदला सुनिश्चित करणे तसेच खरेदी प्रक्रियेत अनियमितता व गैरव्यवहार टाळण्यासाठी कार्यरत खरेदी केंद्रांची तपासणी व चौकशी करण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून दिनांक ०५ जानेवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दक्षता पथक नेमण्याचा निर्णय घेतला आहे. या दक्षता पथकांकडून गोंदिया जिल्ह्यातील इतर तालुक्यांमधील खरेदी केंद्राची देखील तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील हजारो घरकुल बांधकामाच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२७) * ७९१० श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील ४० हजार घरकुल बांधकामाची निविदा प्रक्रिया करताना एकाच लॅपटॉप वरुन भरण्यात आलेल्या निविदांच्या घोटाळयातील पोलिसांनी तपास थांबविल्याबाबतचा सी-समरी अहवाल व न्यायालयात सादर केलेली कागदपत्रे सक्त वसुली संचालनालयाने मागितली असून या निविदा घोटाळयात एकाच लॅपटॉप वरुन निविदाधारकांनी दर भरले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी घरकुल बांधकाम प्रकरणात झालेल्या अनियमिततेबाबत माहे जून, २०२४ मध्ये पोलिसांनी दाखल केलेला "सी समरी अहवाल" प्रथम वर्ग न्यायालयाने स्विकारल्यानंतर महानगरपालिकेने सदर प्रकरण बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घरांसाठी निवडलेले भूखंड हे तेवढ्या भौतिक क्षमतेचे आहेत का याची तपासणी झाली नाही. त्यामुळे डोंगर आणि खाणी यांचाही या भूखंडामध्ये समावेश झाला, प्रत्यक्षात या जागांवर घरे निर्मिती करणे अशक्य असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे विकासकाने बांधलेल्या घरकुलांचे दर म्हाडा, सिडको, औरंगाबाद महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण या शासकीय यंत्रणांनी बांधलेल्या घरकुलांचे दर, त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत विचाराधीन जागेवरील घरकुलांचे दर यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) असल्यास, प्रकल्प प्रस्तावित जागेवर शक्य नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर चौकशी समितीने दिलेल्या अहवालानंतर हा प्रकल्प रद्द करण्यात आला असून टेंडर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घरकुल योजना रद्द करण्यात आले असताना लाभार्थ्यांसाठी लवकरच नव्याने टेंडर प्रक्रिया राबवण्यात येणार आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करुन या तक्रारीबाबत चौकशी सुरु केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुलांच्या बांधकामासाठी एकाच IP Address वरुन निविदा भरण्यात आल्याचे आढळून आल्यानंतर महानगरपालिकेमार्फत संबंधित कंत्राटदारा विरुध्द गु.र.नं. क्र. ७९/२०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी दाखल गुन्हा क्र. ७९/२०२३ मध्ये तपासणी अधिकाऱ्यांनी दिनांक २९/०३/२०२४ रोजी सादर केलेला "सी" समरी अहवाल, मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट तिसरे औरंगाबाद यांनी Cri.M.A.No.८३३/२०२३ या प्रकरणात दिनांक २१/०६/२०२४ रोजी स्वीकारला असल्याने सदरील प्रकरण बंद करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रिये संबंधित तक्रारी/अडचणीच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती (AHP) या घटकांतर्गत मंजूर प्रकल्पांच्या बांधकामासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविलेली आहे व सद्य:स्थितीत प्रत्यक्षात बांधकाम सुरु आहे.

(६) प्रस्तुत प्रकरणी दाखल गुन्हा क्र. ७९/२०२३ मध्ये तपासणी अधिकाऱ्यांनी दिनांक २९/०३/२०२४ रोजी सादर केलेला "सी" समरी अहवाल, मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट तिसरे औरंगाबाद यांनी Cri.M.A.No.८३३/२०२३ या प्रकरणात दिनांक २१/०६/२०२४ रोजी स्विकारला असल्याने सदरील प्रकरण बंद करण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिकेंतर्गत रुग्णालयांतील सोनोग्राफी सेवा पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(२८)** * **६८३५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिकेंतर्गत रुग्णालयांतील सोनोग्राफीची यंत्रणा बंद असून रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांच्या अभावामुळे सदरहू सोनोग्राफी सेवा बंद करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयातील सोनोग्राफी यंत्रणा बंद असल्यामुळे सामान्य रुग्णांना सोनोग्राफीसाठी खासगी रुग्णालयांत जावे लागत असल्याने त्यांचेवर आर्थिक ताण येत असून येथील सोनोग्राफी सेवा बंद राहिल्यामुळे परिसरातील गर्भवती महिला, अत्यवस्थ रुग्ण तसेच सामान्य तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई विरार महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांची किती पदे केव्हापासून रिक्त आहेत तसेच सदरहू पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, रुग्णालयामध्ये कायमस्वरुपी रेडिओलॉजिस्टची नियुक्ती करण्यासाठी व रुग्णांना सोनोग्राफीची सेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

महानगरपालिकेच्या सर डी.एम. पेटीट रुग्णालय, वसई, विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा व सामान्य रुग्णालय, जुचंद्र येथे सोनोग्राफी मशीन उपलब्ध असून सद्य:स्थितीत सर डी. एम. पेटीट रुग्णालय, वसई या ठिकाणी रेडिओलॉजिस्ट उपलब्ध नाही. तथापि, विजयनगर-तुळींज रुग्णालय व सामान्य रुग्णालय, जुचंद्र येथे रेडिओलॉजिस्ट उपलब्ध आहेत. त्यामुळे रुग्णांना सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.
(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालय, जुचंद्र सामान्य रुग्णालय येथे रुग्णांना सोनोग्राफीसाठी पाठविण्यात येते. तसेच महानगरपालिकेमार्फत अभिव्यक्ती स्वारस्यद्वारे खासगी सोनोग्राफी सेंटर येथे सवलतीच्या दरात रुग्णांना सेवा पुरविण्यात येते.

(३) व (४) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर-रेडियोलॉजिस्ट संवर्गात ०२ पदे मंजूर असून, ही पदे रिक्त आहेत. सद्य:स्थितीत मानद तत्त्वावर ०२ रेडियोलॉजिस्ट हे तुळींज रुग्णालयात व ज्युचंद्र सामान्य रुग्णालयात कार्यरत आहेत.

आकृतीबंधातील मंजूर पदे भरण्याच्या अनुषंगाने, आवश्यक ती कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे. तसेच, महानगरपालिकेने दिनांक ०४ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई यांना महानगरपालिकेच्या रेडियोलॉजिस्ट या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत विनंती केली आहे.

सदर रिक्त जागा बंधपत्रित सेवेच्या उमेदवारांमधुन भरण्याकरीता ऑनलाईन पोर्टलद्वारे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या होत्या.

सदर ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याकरीता उमेदवारांचा पसंतीक्रम घेणे आवश्यक असते परंतु वसई विरार महापालिकेतील उक्त रिक्त जागांवर उमेदवारांकडून पसंतीक्रम प्राप्त झालेले नसल्यामुळे सदर रिक्त जागेवर बंधपत्रित उमेदवारांची शिफारस करणे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास शक्य झालेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (मुंबई) येथील राजावाडी रुग्णालयातील रक्त विघटन मशीन सुरु करण्याबाबत

**(२९) * ६८६० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर, मुंबई येथील राजावाडी रुग्णालयातील अत्यंत महत्त्वाची रक्त विघटन मशीन गत अनेक महिन्यांपासून बंद अवस्थेत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब व गरजू रुग्णांना खाजगी रक्तपेढ्यांमधून प्लेटलेट्स, प्लाझमा विकत घ्यावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मशीन बंद असल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांच्या उपचारांमध्ये विलंब होत असल्याने रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णांच्या सुरक्षेचा विचार करुन उक्त रक्त विघटन मशीन तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राजावाडी रुग्णालयातील रक्त विघटन मशीन दिनांक २८ सप्टेंबर, २०२५ ते दिनांक ०९ जानेवारी, २०२६ या कालावधीमध्ये बंद होते.

(२) सदर मशीन बंद असलेल्या कालावधीमध्ये शासनमान्य रक्तपेढीमधून अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) नियमानुसार शुल्क आकारून प्लेटलेट्स, प्लाझमा उपलब्ध करून देण्यात आले.

(३) हे खरे नाही.

रुग्णसेवेत कोणताही खंड पडू नये यासाठी, रक्तघटकांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना सायन रुग्णालय, के.ई.एम. रुग्णालय, नायर रुग्णालय तसेच इतर तृतीयस्तरीय रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येत होते.

(४) सदर मशीन बंद झाल्याचे निदर्शनास येताच यंत्र दुरुस्त करुन घेण्यासाठी तात्काळ दखल घेण्यात आली. तथापि, सदर मशीनसाठी आवश्यक असणारे स्पेअर पार्ट मिळण्याकरीता विलंब झाल्याने दुरुस्तीच्या कामामध्ये विलंब झाला. आवश्यक असलेला स्पेअर पार्ट मिळताच रक्त विघटन मशीन दुरुस्त करुन सुरु करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोहमारा (ता.सडक अर्जुनी, जि.गोंदिया) येथील राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल बांधून अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३०) * ६६४६ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोहमारा (ता.सडक अर्जुनी, जि.गोंदिया) येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ च्या मुख्य चौकात वळणदार मार्गामुळे दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५, दिनांक २२ मार्च, २०२५, दिनांक २३ मार्च, २०२५ आणि ८ डिसेंबर, २०२५ रोजी अनेक जीवघेणे अपघात घडल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोहमारा येथे उड्डाणपूल नसल्यामुळे पादचारी आणि वाहनधारकांना रस्ता ओलांडताना गंभीर समस्या उद्‌भवत असून या महामार्गावर सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे कोहमारा येथील मुख्य चौकात रहदारीचा प्रचंड ताण येत असून, उड्डाणपुलाअभावी अपघातांचे सत्र सुरूच असल्याने शासकीय यंत्रणेवर ताण येत आहे व पर्यायाने नियोजित रस्ते सुरक्षा उपाययोजनांवरील निधीचा योग्य विनियोग होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोहमारा येथील अपघातांच्या वाढत्या कारणांची शासनाने दखल घेऊन त्याअनुषंगाने कोहमारा मुख्य चौकात तातडीने उड्डाणपूल बांधून अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१)हे खरे आहे.

(२) व (३) नागपूर-भंडारा-देवरी हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ चा भाग असून सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत आहे. कोहमारा (ता.सडक अर्जुनी, जि.गोंदिया) येथील रा.म.क्र. ५३ च्या मुख्य चौकात होणारे अपघात विचारात घेऊन सदर ठिकाणी उड्डाणपूल बांधकामास

रुपये ९५.१४ कोटी रकमेस दिनांक ०६/०२/२०२६ रोजी मंजुरी प्राप्त झाली असून सद्य:स्थितीत निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वनहक्काच्या शेतातील धान खरेदी करण्याबाबत

**(३१) * ७७११ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात वन हक्क अधिनियम, २००६ नुसार शेकडो हेक्टर वन जमिनीचे पट्टे शेतकऱ्यांना कसण्यास दिले असून सदर वन हक्काच्या जमिनीतून घेतलेल्या धान उत्पादनाची शासकीय धान खरेदी केंद्रावर वन हक्कधारक शेतकऱ्यांची नोंदणी सुरु करण्यात आली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन हक्काचे पट्टे मिळालेल्या भोगवटादार शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले धान खरेदी करण्याकरीता नोंदणी सुरु करण्याबाबतची मागणी नवेगाव ग्रामपंचायत सदस्यांनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन हक्काचे पट्टे मिळालेल्या भोगवटादार शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले धान खरेदी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा पणन कार्यालय, गडचिरोली अंतर्गत २,२८४ तर आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत ५,०१२ व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांच्याकडे ८४१ वनपट्टेधारक शेतकऱ्यांची किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत BeAM प्रणालीवर ऑनलाईन नोंदणी करण्यात आली आहे.
(२) सदर बाबतचे पत्र अभिलेखामध्ये आढळून येत नसल्याचे मा.मंत्री महोदय (महसूल) यांच्या कार्यालयाकडून अवगत करण्यात आले आहे.
(३) किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप पणन हंगाम २०२५-२६ करीता धान खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ होती. त्यानंतर सदर मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत वाढवून देण्यात आली होती. दुसऱ्यांदा देखील ऑनलाईन नोंदणी करण्याची मुदत दिनांक ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत वाढवून देण्यात आली होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडगाव मावळ व कामशेत (जि.पुणे) येथील सेवा रस्त्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३२) * ७७८१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर कामशेत येथील व्ही.यु.पी. व वडगाव मावळ (जि.पुणे) येथील जोडरस्ता या विकास कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिनांक २८ जून, २०१६ रोजी रुपये २० कोटी ७१ लाख एवढ्या रकमेची निविदा प्रसिध्द केली असता निर्माण कन्स्ट्रक्शनने १३.६६ टक्के कमी दराने रु १७ कोटी ८८ लाखांची निविदा सादर केली असून त्यानुषंगाने महामंडळाने दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी कामाचा कार्यादेश काढून १८ महिन्यात काम पूर्ण करण्याचा कालावधी देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने सल्लागार तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता यांच्या संगनमताने बोगस देयके सादर करुन दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या तिसऱ्या देयकापर्यंत सदर ठेकेदारांनी रुपये ३,०५,१७,४७२/- चे काम पूर्ण केलेले असतानाही त्यांना रुपये १४,२६,४६,८२२/- चे देयक अदा करण्यात आले असून सदर ठेकेदाराला रुपये ११,२१,२९,३५० इतक्या जादा रकमेचे देयक अदा करुन सदर कामांमध्ये अनियमितता झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामात झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी दिनांक ३ जुलै, २०१८ रोजी तक्रारदाराने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी, मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव, मा.अप्पर मुख्य सचिव, सा.बां. विभाग यांच्यासह तक्रारी करुनही अद्याप कोणतीच दखल घेतलेली नसून सदर गैरव्यवहारप्रकरणी होत असलेल्या जाणीवपूर्वक दुर्लक्षाबाबत तक्रारदारानी दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वडगाव मावळ येथील तहसिल कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेमार्फत अंतिम निर्णयाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदारांकडून जादा अदा करण्यात आलेल्या रकमेची व्याजासह वसुली करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांसह ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर कामाच्या तिसऱ्या देयकापर्यंत रुपये ११,२१,२९,३५० इतक्या जादा रकमेचे देयक कंत्राटदारास अदा करुन सदर कामामध्ये अनियमितता झाल्याची बाब खरी आहे. सदर काम इपीसी करारपध्दतीचे असून करारनाम्यातील तरतूदीनुसार कामाचे देयक कंत्राटदाराने सादर करावयाचे होते व झालेल्या कामाची मोजमापे घेऊन देयके प्रमाणीत करुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची होती.

(३) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी तक्रारदाराने दिनांक १२/१२/२०१९ रोजी वडगाव मावळ येथे १ दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले होते. तथापि, तक्रारदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक ३०/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये महामंडळाकडून अहवाल मागविला होता.याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत दिनांक १७/०२/२०२० रोजी चौकशी अहवाल प्राप्त होऊन तद्अनुषंगाने महामंडळाकडून कारवाई सुरु करण्यात आलेली होती.

(४) तक्रारदाराने सन-२०२० मध्ये मा.उप लोक आयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा.उप लोक आयुक्त यांच्या निर्देशानुसार अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे यांनी सदर गैरव्यवहार प्रकरणी चौकशी करुन सन-२०२३ मध्ये दिलेल्या अहवाल शासनास सादर केला. सद्य:स्थितीत काम पूर्ण करण्यात आलेले आहे. कंत्राटदारास अदा करण्यात आलेल्या जादा रकमेची व्याजासह वसुली, दंडनीय रक्कम, कंत्राटदाराच्या जोखीमेवर केलेल्या उर्वरीत कामाची रक्कम, बँक गॅरंटीसाठी राखून ठेवलेली रक्कम व इतर शिल्लक वसूली मिळून रुपये ६.७८ कोटी इतकी रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्याचे प्रस्तावित होते.

सदर रक्कम कंत्राटदाराच्या महामंडळाकडील जमा रक्कम व तद्नंतर झालेल्या कामाचे देयक यातून वसुली करण्यात येऊन आजमितीला उर्वरीत रक्कम रुपये ६९,७०,७७४/- महसुली वसुली म्हणून वसूल करण्यासाठी महामंडळामार्फत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविण्यात आले असून त्यांच्यामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, महामंडळाकडून करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे टिम लिडर यांना पाच वर्षांसाठी प्रतिबंधित करण्यात आले व कंत्राटदाराला एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आले. कामाचे उप अभियंता यांची एक वर्षाची वेतनवाढ रोखण्यात आली. तथापि, कंत्राटदाराने त्याच्यावर केलेल्या कार्यवाही विरोधात मा.उच्च न्यायालय येथे रिट याचिका दाखल केलेली आहे.

मा.उप लोक आयुक्त यांच्याकडून याप्रकरणी शासनास शिफारस अहवाल प्राप्त झाला आहे व तद्अनुषंगाने शासन निर्णयास्तव कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिठी नदीच्या पुराचे पाण्यामुळे परिसरातील रहिवाशांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्याबाबत

**(३३) * ८५५२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मिठी नदी लगतच्या कुर्ला गार्डन, कुर्ला कोर्ट, टॅक्सीमन कॉलनी, कापडिया नगर, सीएसटी रोड, क्रांतीनगर, संतोष नगर, कमानी बैल बाजार, जरीमरी परिसरातील झोपड्यांमध्ये मिठी नदीच्या पुराचे पाणी भरल्याने दरवर्षी हजारो रुपयांचे नुकसान होते घरातील लाकडी सामान वाळवी लागून नष्ट होते, इलेक्ट्रीक उपकरणे खराब होतात मिठी नदीचे पुराचे पाणी अडविण्यासाठी संरक्षक भिंत उभारली परंतु सदर काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदीतील गाळ उपसण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असून स्वच्छता, यंत्रसामुग्री, गाळवहन आणि गाळ टाकण्यासाठी मोठमोठ्या निविदा काढल्या जातात, तसेच प्रत्यक्षात ही नदी कायम गाळाने भरलेली, दुर्गंधीयुक्त आणि धोकादायक स्वरूपात दिसते, मुंबई पालिकेकडून २००५ सालापासून दरवर्षी मिठी नदीतील गाळ उपसण्याचे काम निविदा पध्दतीने दिले जात असून 'एसआयटी'च्या तपासानुसार, गाळाचे प्रमाण ठरवण्यासाठी कोणतीही शास्त्रीय किंवा तांत्रिक पध्दत अवलंबण्यात आली नाही. प्रत्यक्षात गाळ किती आहे, याचे सर्वेक्षण 'बॉटम लेव्हल मेझरमेंट' किंवा 'बॅथीमेट्री' सारख्या वैज्ञानिक तपासणीशिवाय करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) मिठी नदी प्रकरणात प्रत्येक वर्षाचे गाळ काढण्याचे प्रमाण हे वारंवार वाढविण्यात येऊनही प्रत्यक्ष गाळ तसाच होता, त्याचे प्रमाण दुय्यम अभियंता अंदाजाने ठरवून प्रत्यक्षात मिठी नदीपात्रात किती प्रमाणात गाळ आहे याची कोणतीही शास्त्रीय तपासणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशाप्रकारे गाळाचे प्रमाण अंदाजाने वाढवून निविदेची रक्कम वाढवत कंत्राटदाराच्या आणि स्वतःचा फायदा करून महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीस कारणीभूत ठरल्याचे 'एसआयटी'च्या तपासात स्पष्ट झाले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मिठी नदी (Mithi River) ओव्हर फ्लो झाल्यानंतर नदी परिसर जलमय होऊ नये यासाठी मुंबई महापालिकेने मिठी नदीच्या ८ किलोमीटर परिसरात सुरक्षित दरवाजे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. समुद्राचे पाणी मिठी नदीत येते, अशा २८ ठिकाणी हे दरवाजे बसवण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मिठी नदीचा प्रत्येक वर्षी गाळ काढून रुंदीकरण करण्यात येत असतानाही नागरी वस्तीमध्ये पावसाचे पाणी येत असल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होत असून या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

मिठी नदीच्या किनाऱ्यांलगत असलेल्या कुर्ला गार्डन, कुर्ला कोर्ट, कपाडिया नगर येथील संरक्षक भिंत बांधण्याचे काम एम.एम.आर.डी.ए.मार्फत पूर्ण करण्यात आले आहे. तसेच, संतोष नगर, कमानी क्रांतीनगर, जरीमरी येथील संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण झालेले आहे व सीएसटी रोड, बैल बाजार या परिसरातील अपूर्ण असलेली मिठी नदीची संरक्षण भिंत बांधण्याचे काम मिठी नदी विकास व प्रदूषण नियंत्रण प्रकल्प पॅकेज-२ अंतर्गत प्रगतीपथावर आहे. तसेच टॅक्सीमन कॉलनी येथील संरक्षक भिंत बांधण्याचे काम मिठी नदी विकास व प्रदूषण नियंत्रण प्रकल्पातील पॅकेज-३ अंतर्गत प्रगतीपथावर आहे. तसेच, सदर ठिकाणी बाधित बांधकामे / अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया संबंधित विभाग कार्यालयामार्फत करण्यात येते. वर नमूद केलेला परिसर भौगोलिकदृष्टया सखोल असल्याकारणाने येथे अतिवृष्टीदरम्यान पाणी साचते.

(२) व (३) हे खरे आहे.

मिठी नदीमध्ये एकूण गाळाचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणात आहे. मिठी नदीचा प्रवाह सुरळीत राहावा व मिठी नदी लगतच्या परिसरात पुर परिस्थिति निर्माण नदीतील गाळ होऊ नये या बाबीचा विचार करून दरवर्षी अंदाजपत्रक काढण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीनुसार म्हणजेच लांबी, रुंदी व खोलीचे प्रमाण घेऊन तयार करण्यात येते. सदर अंदाजपत्रक तयार करताना मिठी नदीतील गाळ

काढण्यासाठी गाळाची खोली १० सेंटीमीटर ते ३० सेंटीमीटर इतकी अंदाजित पकडून अंदाजपत्रक तयार करण्यात येते व सक्षम अधिकारी यांच्या मान्यतेने मिठी नदीतील गाळ काढण्याच्या निविदा मागविण्यात येतात.

(४) सदर प्रकरणी एसआयटी गठित करण्यात आली असून, एसआयटीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(५) अंशत: खरे आहे.

पावसाळ्यादरम्यान अतिवृष्टीच्या वेळेस व समुद्रास उच्च भरती (High Tide) असल्यास मिठी नदीची पाण्याची पातळी वाढते, परिणामी मिठी नदीत पाथमुखाद्वारे येणाऱ्या पावसाच्या पाण्याची गती संथ होऊन पाणी मिठी नदीत न येता ते मिठी नदीच्या आजूबाजूच्या परिसरात साचून पुर परिस्थिति निर्माण होते. त्यामुळे मिठी नदी परिसर जलमय होऊ नये यासाठी मुंबई महापालिकेने मिठी नदीच्या ७.६ किलोमीटर परिसरात उदंचन संचासहित पूर नियंत्रण दरवाजे (फ्लड गेट) बसवण्याचा निर्णय घेतला आहे.

यासाठी उदंचन संचासहित १८ ठिकाणच्या पातमुखांवर पूर नियंत्रण दरवाजे (फ्लड गेट) बांधण्याची कामे मिठी नदी विकास व प्रदूषण नियंत्रण प्रकल्प (पॅकेज-३) या कामामध्ये अंतर्भुत करण्यात आले आहे. सदर काम करण्याकरीता नियुक्त कंत्राटदारास माहे डिसेंबर, २०२५ मध्ये कार्यादेश देण्यात आलेला असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

(६) मिठी नदी विकास प्रकल्पाचे काम दोन टप्प्यांमध्ये करण्यात आलेले असून टप्पा-१ अंतर्गत मिठी नदीचे १६ ते ६० मी. पर्यंत रुंदीकरणाचे काम सन २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. टप्पा-२ अंतर्गत मिठी नदीचे अतिरिक्त रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षण भिंत, सेवा रस्ता बांधणे तसेच मिठी नदीमध्ये उत्सर्जित होणारे सांडपाणी अडवून ते मलनिस्सारण वाहिन्यांद्वारे मुख्य मलनिस्सारण वाहिन्यांमध्ये वळविणे इत्यादी कामे सन २००७ पासून करण्यात येत आहेत. टप्पा-२ अंतर्गत लघु मुदतीची (पॅकेज-१) व दिर्घ मुदतीची (पॅकेज-२, ३ व ४) कामे सुचविली आहेत. त्यातील पॅकेज-१ मधील कामे पूर्ण झालेली असून, पॅकेज-२, ३ व ४ मधील कामे प्रगतीपथावर आहेत.

-----------------

## राज्यात शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानांवर कारवाई करण्याबाबत

**(३४) * ८२८६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळा महाविद्यालयाच्या परिसरात पान तंबाखू विकणाऱ्या टपऱ्या, जुगार अड्डे, दारुची दुकाने, बार असू नये असा नियम असताना शाळा महाविद्यालयातील गेटला लागूनच पान तंबाखू विकणाऱ्या टपऱ्या आहेत या टपऱ्यांमध्ये छुप्या पध्दतीने बंदी असलेला गुटखा व मावा विकला जातो असे असताना प्रशासन मात्र दुर्लक्ष करीत असून कमी वयातच विद्यार्थी व्यसनाधिन होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शाळांच्या मीटर परिसरात पान, तंबाखू, गुटखा, अफू, गांजा इत्यादींची दुकाने असू नयेत, असे आदेश शासनाने काढले असतानाही त्याबाबत पोलीस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन तसेच महानगरपालिकेकडून त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे इयत्ता आठवी, नववी,

अकरावी, आणि बारावीत शिकणाऱ्या मुलांना लहान वयातच या व्यसनांना ग्रासले असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत एम्स दिल्लीच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या अभ्यासात राज्यासह देशातील १० प्रमुख शहरांमध्ये तसेच विशेषत: सांगली जिल्ह्यातील विटा व कुपवाड तालुक्यातील एम.आय.डि.सी. मध्ये कवठेमहांकाळ तालुक्यातील इरळी येथे तसेच मो.सावरी (ता.जावळी, जि.सातारा) यासह अनेक शाळांच्या १०० मीटरच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री आणि सेवन होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांच्या शंभर मीटरच्या परिसरात गुटखा, तंबाखू, सिगारेटसह इतर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणे कायद्याने गुन्हा असतानाही शहापूर ग्रामीणमधील काही जिल्हा परिषद शाळा व महाविद्यालयाशेजारी गुटख्याची खुलेआम विक्री केली जात असून पिंपरी, काळेवाडी, थेरगाव, चिंचवड, आकुर्डी, रहाटणी, निगडी अशा भागात पान टपऱ्या, किराणा दुकाने आणि स्टॉल्सवर खुलेपणे विक्री सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शाळेपासून १०० मीटर अंतराचा हा नियम / कायदा शाळेच्या एकूण परिसरापासूनच्या चारीबाजुंकरीता ग्राह्य धरून विद्यार्थांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये पोलिसांकडून COPTA (तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ अधिनियम) अंतर्गत माहे एप्रिल, २०२५ ते जानेवारी, २०२६ पर्यंत एकूण २३,२०३ केसेस दाखल करण्यात आल्या असून एकूण ३,७७,८५,६६९/- रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ अंतर्गत ३३,२२१ केसेस दाखल करण्यात आलेल्या असून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत १,२३,०३३ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

माहे १ एप्रिल, २०२५ ते ३१ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यातील शाळा/महाविद्यालय लगतच्या परिसरात प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री बाबत एकूण ६७ अन्न आस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या असून त्यापैकी ६ आस्थापनांमध्ये प्रतिबंधित अन्न पदार्थांची विक्री होत असल्याचे आढळून आले. सदर ठिकाणी रुपये १,००,२५० किमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे व सर्व प्रकरणी FIR दाखल करण्यात आले आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्यात सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंध कायदा, २००३ नुसार वेळोवेळी कलम ६(ए) व कलम ६(बी) अन्वये ४३ व्यक्तींवर केस करून त्यांना रुपये ८६००/- रुपये इतका दंड आकारण्यात आला असून सदर व्यक्तींना लेखी नोटीस देण्यात आल्या आहेत.

(४) अन्न व औषध प्रशासनाने ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यामध्ये दिनांक २२/०७/२०२५ रोजी शाळा महाविद्यालयाच्या परिसरात प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्रीबाबत १ आस्थापनेची तपासणी केली आहे. सदर तपासणीदरम्यान रुपये ९८४००/- किमतीचा साठा जप्त केला असून. सदर आस्थापनेवर कारवाई करून FIR दाखल करण्यात आला आहे. तसेच, पिंपरी चिंचवड पोलिसांकडून सन माहे एप्रिल, २०२५ ते

माहे जानेवारी, २०२६ पर्यंत पिंपरी, काळेवाडी, थेरगाव, चिंचवड, आकुर्डी, रहाटणी, निगडी या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांच्या १०० मीटरच्या परिसरात गुटखा, तंबाखु, सिगारेटसह इतर तंबाखुजन्य पदार्थांची विक्री करणे बाबत ०६ गुन्हे, २३९ खटले व रुपये १,९६,९६५/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(५) अन्न व औषध प्रशासनामार्फत Eat Right School Initiative या मोहिमेअंतर्गत राज्यातील शाळेतील विद्यार्थ्यांना सकस व पौष्टीक आहाराच्या सवयी लावणे तसेच, विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम समजून सांगणे व त्यापासून परावृत्त करण्याकरीता प्रयत्न केले जातात.

पोलिसांकडून नशामुक्त अभियान कार्यक्रम राबवुन शाळा, कॉलेज महाविद्यालय, सोसायटी इत्यादी ठिकाणी जाऊन नागरिकांमध्ये तंबाखुजन्य पदार्थ व अंमली पदार्थ सेवन केल्यामुळे होणारे दुष्परिणाम, व्यसनापासून दूर राहण्याचे उपाय-योजना, याबाबत माहिती देवून मार्गदर्शन करण्यात येते.

अमली पदार्थ विरोधी परिणामकारक कारवाया होण्यासाठी व नशामुक्त करण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन येथे अटी नार्कोटीक्स स्कॉडची (ANS) स्थापना करण्यात आली आहेत. या मार्फत जनजागृती तसेच अंमली पदार्थ विरोधी कारवाया केल्या जातात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील पाथर्डी कचरा डेपोमधील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याबाबत

**(३५) * ७९११ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात दररोज जमा होणारा ८०० ते ८५० मेट्रिक टन घनकचरा कोणत्याही शास्त्रीय प्रक्रियेविना (Scientific Processing) पाथर्डी डेपोमध्ये टाकला जात असल्याची बाब निदर्शनास असून पाथर्डी येथील ‘कचरा प्रक्रिया प्रकल्पाची’ (Waste Processing Plant) मूळ क्षमता ही वाढत्या नागरिकरणामुळे अपुरी पडत असून, येथील यंत्रसामग्री वारंवार नादुरुस्त असल्यामुळे परिसरात दुर्गंधी व प्रदूषणाची समस्या निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षांपासून साचलेल्या लाखो टन कचरा ‘बायो-मायनिंग’ (Bio-mining) प्रक्रियेद्वारे नष्ट करण्याच्या कामासाठी नियुक्त कंत्राटदाराने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे दंड आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) घनकचरा व्यवस्थापन अधिनियमानुसार प्रत्येक नागरिकाने घरगुती तसेच व्यावसायिक कचऱ्याचे वर्गीकरण करून देणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने ‘स्वच्छ भारत मिशन’च्या मार्गदर्शक सूचनेनुसार १०० टक्के ‘कचरा विलगीकरण’ (Source Segregation) न करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्या व व्यावसायिक आस्थापनांवर नाशिक महानगरपालिकेने गेल्या सहा महिन्यात दंडात्मक कारवाई केली आहे,हेही खरे आहे काय,

(४) असल्यास आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या काळात शहरात दररोज अतिरिक्त ३०० ते ४०० टन कचरा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्पाला शासनाची मान्यता प्राप्त होवून हा प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित

होण्यासाठी आवश्यक त्या सर्व समस्यांचे निराकरण करुन नवीन ‘वेस्ट टू एनर्जी’ किंवा ‘मटेरिअल रिकव्हरी फॅसिलिटी’ प्रकल्प उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही, हे, खरे नाही

नाशिक महानगरपालिकेने शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे व विल्हेवाट लावणेकामी चा प्रकल्प सन २०१७ पासून खाजगी यंत्रणेमार्फत चालविण्यात येत आहे. त्यानंतर वेळोवेळी आवश्यक मशीनरी पुरवठा करुन व अनुषंगीक कामे करुन सद्य:स्थितीत प्रकल्पाची क्षमता सुमारे ९०० मे. टन प्रति दिन इतकी करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत शहरातून दररोज सुमारे ७५० ते ८०० मे. टन प्रति दिन कचरा जमा केला जातो. प्रकल्पाची पुरेशी क्षमता असून दैनंदीन येणाऱ्या संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत असल्याने परिसरात दुर्गधी व प्रदुषणाची समस्या उध्दभवत नाही.
(२) नाही, हे खरे नाही

नाशिक महानगरपालिके मार्फत बायोमायनिंग प्रक्रियेव्दारे कचरा नष्ट करण्याकामी कुठल्याही स्वतंत्र कंत्राटदाराची नेमणूक केलेली नाही. त्यामुळे मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे दंड आकारण्याचा प्रश्न उध्दभवत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सिहस्थ कुंभमेळा २०२७ त्या काळात शहरात दररोज अंदाजे २०० मे. टन अतिरिक्त कचरा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता प्रकल्पाची क्षमता वाढविणे बाबत नियोजन केलेले आहे. त्या करीता प्रिसॉर्टींग, कंपोस्टींग, आरडीएफ युनिट मध्ये अतिरिक्त मशीनरी बसविण्याचे काम सुरु आहे. त्याव्दारे प्रकल्पाची क्षमता सिंहस्थापूर्वी ११०० टन प्रतिदिन पर्यंत वाढविण्यात येणार आहे. मनपा मार्फत कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करण्यासाजी वेस्ट टू एनर्जी अथवा मटेरिअल रिकव्हरी फॅसिलीटी उभारण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला नाही. सिंहस्थ विचारात घेता मनपा मार्फत प्रकल्प क्षमता वाढविणे करीता वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

आजमितीस कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी नाशिक मनपाकडे पुरेशा क्षमतेचा प्रकल्प उपलब्ध असून त्याठिकाणी दैनंदिन जमा होणाऱ्या संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड शहरातील अतिक्रमणे हटविण्याच्या मोहीमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(३६) * ७९९८ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या वतीने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास देगलूर नाका येथील शहर वाहतुकीला अडथळा ठरत असलेली अतिक्रमणे हटविण्यात आली, सदर अतिक्रमणे हटवण्यासाठी मोहीम संपूर्ण शहरात राबविणे आवश्यक असताना एकाच दिवसात ही मोहिम समाप्त करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील वाहतूक कोंडीला अतिक्रमण हे एक कारण असून वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, बेशिस्त वाहनचालक तसेच रस्त्याच्या दुतर्फा असलेली अतिक्रमणे यामुळे वाहनधारकांना वाहतूक कोडींला सामोरे जावे लागते या भागातील अतिक्रमण हटविण्याकरीता सदर मोहीम सुरु ठेवणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातत्याने होणारी वाहतूक कोंडी कमी करणे आणि पादचाऱ्यांसाठी रस्ते मोकळे करण्याकरीता देगलूर नाका परिसरातील नांदेड शहरातील विविध भागातील अतिक्रमण हटविण्याच्या दृष्टीने सदर मोहीमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमधील देगलूर नाका परिसरातील अतिक्रमणांबाबत दिनांक २१/०४/२०२५ व दिनांक ०४/११/२०२५ रोजी महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाद्वारे कारवाई करण्यात आली.

महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकामार्फत सातत्याने शहराच्या विविध भागामध्ये अतिक्रमण हटविणेबाबत कारवाई केली जाते.

(२) हे अंशत: खरे आहे.

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये अतिक्रमण धारकांवर कारवाई करणेसाठी महानगरपालिकेतर्फे नांदेड दक्षिण व नांदेड उत्तर असे दोन अतिक्रमण पथके नेमण्यात आली आहेत. सदर पथकांमार्फत अतिक्रमण हटविण्याची कारवाई दैनंदिन करण्यात येते. तसेच महानगरपालिकेकडून महानगरपालिका हद्दीमध्ये मुख्य रस्त्यावर भरणारे आठवडी बाजार इतरत्र स्थलांतरीत करण्यात आले असून मुख्य रस्ते वाहतुकीस मोकळे करण्यात आले आहेत.

(३) अतिक्रमण हटविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदी व्यवस्था प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(३७)** * **८०८८ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मक्यासाठी प्रतिक्विंटल रुपये २,४०० इतका हमीभाव घोषित केल्याने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला असतानाही, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात शासकीय हमीभाव मका खरेदी केंद्रास मंजुरी देण्यात आली असूनही प्रत्यक्ष मका खरेदी सुरू करण्यात आलेली नसल्यामुळे शेतकऱ्यांचा मका खरेदीविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या आवाहनानुसार पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दीष्ट्य साध्य करण्यासाठी इथेनॉल निर्मितीस चालना देण्यात येत असताना, मका ऐवजी तुकडा तांदूळ वापरण्यात येत असल्यामुळे मका उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचेही त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या आवाहनानंतर अनेक शेतकऱ्यांनी मका उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ केलेली असतानाही, मका खरेदीसाठी शासकीय हमीभाव मका खरेदी केंद्र उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांचा मका खरेदी न होता बाजारात त्यांना हमीभावापेक्षा सुमारे ३० टक्क्यांनी कमी दर मिळत असल्याने प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदी करण्याच्या उद्देशाने राज्यातील सुमारे १५ जिल्ह्यांमध्ये खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आलेली असताना, प्रत्यक्षात केवळ दोनच जिल्ह्यांमध्ये मका खरेदी सुरू असल्यामुळे उर्वरित जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना खरेदीचा लाभ मिळत नसल्याने शासनाच्या इथेनॉल निर्मितीसाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध असूनही शासकीय उद्दिष्टे साध्य होण्यास अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैजापूर तालुक्यासह राज्यभरातील सर्वच तालुक्यांतील शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेला मका तात्काळ व विनाविलंब खरेदी करण्यासाठी संबंधित मका खरेदी केंद्रे सुरु करुन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप वैजापूर तालुक्यात माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात ४०० क्विंटल मका खरेदी करण्यात आला होता.

दिनांक ०४ मार्च, २०२६ अखेर वैजापूर तालुक्यातील ३ खरेदी केंद्रावर २३८६ शेतकऱ्यांनी खरेदी केली असून ४६५२.५० क्विंटल इतक्या मक्याची योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेला आहे.

(२) दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ च्या केंद्र सरकारच्या धोरणानुसार दिनांक १ एप्रिल, २०२६ पासून पेट्रोलमध्ये २०% इथेलॉन मिश्रणाचे धोरण लागू केले आहे.

किमान आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारा मका केंद्र शासनाच्या धोरणानुसार सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वितरीत केला जातो. प्रस्तुत योजनेंतर्गत इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदी केला जात नाही.

केंद्र शासनाच्या दिनांक ०४ जून, २०१८ च्या Biofuel धोरणानुसार ऊसाची मळी, कृषी अवशेष, स्टार्चयुक्त पदार्थ (मका, बटाटा) तसेच मानवी खाण्यास अयोग्य असलेला गहु, तुकडा तांदुळ इ. पदार्थापासून ईथेनॉलची निर्मिती केली जाते. सदर धोरणान्वये अन्नधान्याच्या अतिरिक्त उत्पादनाचा आढावा घेऊन अतिरिक्त धान्याची ईथेनॉल निर्मितीसाठी रूपांतर करण्याचे धोरण आहे.

केंद्र शासनाच्या अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२५ ते ३० जून, २०२६ या कालावधीकरीता भारतीय अन्न महामंडळ (FCI) यांच्याकडे उपलब्ध असलेला अतिरिक्त तांदूळ (कमाल ५२ लाख मेट्रीक टन) इथेनॉल निर्मितीकरीता distilleries ना विक्री करीता मंजुरी दिली आहे.

(३), (४) व (५) सदर योजनेंतर्गत पणन हंगाम २०२५-२६ मध्ये दिनांक ०५/०३/२०२६ अखेर १४ जिल्ह्यांमध्ये ६०,०३५ शेतकऱ्यांनी शासनाकडे मका विक्री करण्यासाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी १४ जिल्ह्यांमध्ये १३,६६० शेतकऱ्यांकडून, ५,६८,३३१.८ क्विंटल मक्याची आधारभूत किंमत रुपये २४००/- प्रति क्विंटल याप्रमाणे खरेदी करण्यात आली आहे.

राज्य शासनाकडून मका खरेदीचे उद्दिष्ट व मुदत वाढवून देण्यासाठी केंद्राकडे विनंती करण्यात आली होती. त्यानुसार केंद्र शासनाकडून मूळ मंजूर ६,६०,००० क्विंटल मका खरेदी उदिष्टाव्यतिरिक्त अतिरिक्त ५,००,००० क्विंटल मका खरेदीचे उदिष्ट प्राप्त झाले आहे. तसेच खरेदी करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत वाढवून दिली आहे. यामुळे मका खरेदीचे परिमाण वाढणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने कंत्राटी कर्मचाऱ्यांची पॅकेज विभागणी करताना निविदा प्रक्रियेत अनियमितता केल्याबाबत

**(३८)** * **८५०३ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील सुमारे २२०० कंत्राटी कर्मचारी हे चार पॅकेजमध्ये(अ,ब,क,ड) विभागणी करतांना महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात अनियमितता करुन निविदा प्रक्रियेत मूलभूत नियमांचे उल्लंघन केल्याचे माहे फेब्रुवारी,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्था.स्वराज्य संस्थांच्या नियमानुसार निविदा अंतिम करतांना किमान ३ पात्र निविदा आवश्यक असणे बंधनकारक असताना या प्रक्रियेत कांही पॅकेजमध्ये केवळ दोन, तर एका पॅकेजमध्ये अवघी एकच निविदा पात्र ठरलेली असतानाही पुढील प्रक्रिया राबविण्यात आली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदा नियमांत बसवण्याकरीता सार्व.बांधकाम विभागाचा दिनांक २७ सप्टेंबर,२०१८ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली परंतु सदर शासन निर्णय केवळ बांधकाम संदर्भात लागू असताना प्रशासकीय सेवांसाठी वापर केला गेला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने चार कंपन्यांची निवड करतांना निविदा प्रक्रिया अवैधपणे राबविण्यात आलेली असून नियमाचे उल्लंघन करुन राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया तात्काळ रदद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत अ ाहे तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेद्वारे बाहृस्त्रोत पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी ४ पॅकेज (पॅकेज-A, पॅकेज-B, पॅकेज-C, पॅकेज-D) मध्ये दिनांक २१/०७/२०२५ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. महानगरपालिकेने कळविल्यानुसार सदर निविदेमध्ये बाह्यस्त्रोत कामगार पुरवठ्यासाठी

आवश्यक अशा पात्रता निकषांचा समावेश करण्यात आला असून निविदा प्रक्रिया पारदर्शक, न्याय व केंद्रीय दक्षता आयोगाच्या (Central Vigilance Commission-CVC) मार्गदर्शक तत्वांनुसार पार पाडण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महानगरपालिकेच्या निविदा समितीच्या दिनांक १४/१०/२०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये पॅकेज-A व B साठी प्रत्येकी दोन, पॅकेज-C साठी एक व पॅकेज-D साठी तीन निविदा धारक पात्र ठरविण्यात आले.

सदर बैठकीमध्ये केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (Central Vigilance Commission Guidelines) निविदांना मान्यता देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ३.८५ टक्के सर्विस चार्ज दर निश्चित करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या निविदा समितीच्या बैठकीमध्ये केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार (Central Vigilance Commission Guidelines) निविदांना मान्यता देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बनावट कफ सिरपच्या वापर व विक्रीवर बंदी घालण्याबाबत

**(३९)** * **७९१८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्न व औषध प्रशासन अंतर्गत कफ सिरपची विक्री करणाऱ्या मेडिकलच्या तपासणीसाठी १ लाख दुकानांपैकी फक्त ५३८ मेडिकल दुकानांची तपासणी करण्यात आली असता बनावट कफ सिरपचा वापर व विक्री होत असल्याने राज्यातील रुग्णांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर विपरित परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांची रिक्त जागांसमवेत भेसळयुक्त औषधे तपासणीसाठी राज्यात केवळ नागपूर, नाशिक आणि पुणे या तीनच ठिकाणी प्रयोगशाळा आहेत. संपूर्ण राज्याच्या औषधींचा भार या तीन प्रयोगशाळांवर असल्याने तपासणी अहवाल यायला दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लागतो. यामुळे विषारी कफ सिरपसारख्या औषधींचे तपासणी होईपर्यंत रुग्णांचा जीव धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात दिवसेंदिवस बनावट व दर्जाहीन औषधांच्या पुरवठ्याचे प्रमाण वाढले आहे, असून नांदेड येथील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर प्रकरणी तीन व्यक्तींविरुध्द वजीराबाद पोलीस स्टेशनमध्ये माहे जानेवारी, २०२५ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सार्वजनिक रुग्णालयांमध्ये रुग्णांना दिले जाणारे औषध बनावट असल्याचा संशय आल्यास त्या औषधांचे नमुने तपासण्यासाठी प्रयोगशाळा विश्लेशकाकडे पाठविले असता त्याचा अहवाल येण्यास जवळपास एक ते दीड वर्षाचा कालावधी लागत असून औषधांचे नमूने त्वरीत तपासून अहवाल लवकर सादर करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, वारंवार दोषी आढळून येत असलेल्या मेडिकलला सूचना देऊनही जे मेडीकल चालक नियमांचे उल्लंघन करीत असल्यास अशा दुकानचालकाला दोषी धरुन त्यांचा परवाना रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, राज्यात असलेल्या मेडिकल दुकानांची संख्या लक्षात घेता राज्यातील सर्व मेडिकल दुकानांची तपासणी करण्याकरीता शासनाने कोणती तात्काळ व्यवस्था वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

मध्यप्रदेशमध्ये COLDRIF SYRUP B.N. SR-१३ या दूषित कफ सिरपच्या सेवनामुळे झालेल्या बालमृत्यूच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये कफ सिरपची विक्री डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय न करण्याबाबत किरकोळ विक्रेत्यांना परिपत्रकाद्वारे निर्देश देण्यात आले असून या निर्देशाचे पालन केले जाते किंवा कसे, यासाठी विशेष मोहीम राबवून एकूण ६२७ किरकोळ विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्या होत्या. सदर मोहिमेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासण्या व्यतिरिक्त अन्न व औषध प्रशासनाद्वारे माहे एप्रिल, २०२५ ते माहे, जानेवारी २०२६ या कालावधीत एकूण ५००१ किरकोळ औषध विक्री पेढ्यांच्या तपासण्या करण्यात आल्या व उल्लंघन आढळून आलेल्या प्रकरणी १३९६ पेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले. तसेच, गंभीर उल्लंघन प्रकरणी ३०१ पेढ्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.

राज्यात औषधांची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे अन्न व औषध प्रयोगशाळा कार्यरत आहेत. तसेच, पुणे व नाशिक येथे प्रस्तावित प्रयोगशाळेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

औषध नियंत्रण प्रयोगशाळेचे बळकटीकरण करण्यासाठी ५१ तांत्रिक मनुष्यबळाची पदभरती प्रक्रिया पूर्ण झाली असून नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. राज्यातील तिनही प्रयोगशाळेत Diethylene Glycol व Ethylene Glycol च्या विश्लेषणासाठी नमुने प्राप्त होत आहेत. अद्याप पर्यंत प्राप्त नमुन्यांपैकी २६५ नमुन्यांचे विश्लेषण पूर्ण झाले असून ४० नमुन्यांचे विश्लेषण प्रगतीपथावर आहे. आतापर्यंत एकही नमुना बनावट किंवा त्यामध्ये Diethylene Glycol व Ethylene Glycol या विषारी घटकांची भेसळ असल्याचे आढळून आले नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

नांदेड येथील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा प्रकरणी तीन व्यक्तींविरूध्द वजिराबाद पोलीस स्टेशन, नांदेड येथे माहे जानेवारी, २०२५ मध्ये गुन्हा क्र.२७/२०२५ नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड येथे आरोपींविरूध्द दिनांक २०/१०/२०२५ रोजी खटला दाखल करण्यात आला असून खटला क्र.१९४४/२०२५ असा आहे.
(४), (५) व (६) राज्यात औषधांची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे अन्न व औषध प्रयोगशाळा कार्यरत आहेत. तसेच, पुणे व नाशिक येथे प्रस्तावित प्रयोगशाळेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

औषध नमुने विश्लेषणास गती येण्याकरीता प्रयोगशाळेत अद्ययावत उपकरणांची खरेदी करण्यासाठी GeM पोर्टल व Maha Tender वर खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

माहे एप्रिल, २०२५ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीत राज्यात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ चे वारंवार उल्लंघन करणाऱ्या ४२ औषध विक्रेत्यांपैकी १५ औषध विक्रेत्यांवर दीर्घकाळासाठी परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे व २७ औषध विक्रेत्यांचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आले आहेत.

औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ च्या तरतुदीनुसार औषधी पेढ्यांची तपासणी किमान तीन वर्षातून एकदा करण्याची तरतूद आहे. राज्यात औषध निरीक्षकांची २०० पदे मंजूर आहेत. सद्य:स्थितीत त्यापैकी ४१ पदे भरलेली असून, १५९ पदे रिक्त आहेत. औषध निरीक्षकांची एकूण १५९ रिक्त पदांपैकी १५४ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत दिनांक २२/०३/२०२६ रोजी चाळणी परीक्षा घेण्यात येणार आहे. तसेच, राज्यात सहायक आयुक्त (औषधे) या पदांची एकूण ६७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी एकूण ४९ पदे भरलेली असून १८ पदे रिक्त आहेत. त्यापैकी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १५ पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्याचा अंतिम निकाल दिनांक १३/०२/२०२६ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करण्याबाबत

**(४०) * ६८२० श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेकायदेशीरपणे लावण्यात येणाऱ्या होर्डिंगमुळे शहराचे, परिसराचे सौंदर्य खराब होत असल्याने अशा बेकायदेशीर होर्डिंगवर कारवाई करणे आवश्यक असताना कारवाई होत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात बेकायदेशीरपणे लावण्यात येणाऱ्या होर्डिंगचे छायाचित्र व ठिकाणे अपलोड करण्याची सुविधा असलेले टोल फ्री क्रमांक सुरू करणे, प्राप्त निनावी तक्रारींच्या अनुषंगाने बेकायदा होर्डिंगवर कारवाई करणे, महानगरपालिकेमार्फत नियुक्त नोडल अधिकाऱ्यांनी दररोज वॉर्डमध्ये फिरुन बेकायदा होर्डिंगवर करावयाची कारवाई निश्चित करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील महानगरपालिका आस्थापनांकडून अशा बेकायदेशीरपणे लावण्यात आलेल्या होर्डिंगवर कारवाई करण्यास दिरंगाई करण्यात येत असल्यामुळे मा.न्यायालयाकडून याबाबत काही सूचना करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.न्यायालयाने सदर प्रकरणी केलेल्या सुचनांची प्रभावीपणे अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) राज्यातील अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग व पोस्टर्स बाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.१५५/२०११ मे.सुस्वराज्य फौंडेशन सातारा आणि इतर विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर या याचिकेवरील सुनावणी मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३१/०१/२०१७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९/१२/२०२४ रोजी या प्रकरणी पुन्हा सविस्तर आदेश सर्व संबंधित प्राधिकरण यांना दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार नगरविकास विभागाने सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्यासाठी होर्डिंग जाहिरात धोरण / मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वेळोवेळी होर्डिंग/फलक/बॅनर्स यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनस्तरावरून देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंदिरा अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो. गोवंडी (पूर्व) या संस्थेस भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत

**(४१) * ६८९६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो. गोवंडी (पूर्व) ह्या सन १९८८ पासून अस्तित्वात असलेल्या गृहनिर्माण संस्थेचे मूळ जमीन मालक बाणगंगा को.ऑप.हौ.सो. यांनी सन १९८६ च्या विकास करारानुसार २१३५०.२५ चौ.फु. चटई क्षेत्राचे ३६५८ चौ.फु. संभाव्य चटईक्षेत्र, रस्ते विकास आराखडा तसेच १०७८.३७ चौ.फु. इमारतींभोवती सोडावी लागणारी मोकळी जागा क्षेत्राचा आराखडा अद्यापर्यंत महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला नसल्यामुळे सदर सदनिकेला फक्त सशर्त भोगवटा प्रमाणपत्र दिले असून पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र अद्याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सदनिकेचा विकास आराखडा न दिल्यास बाणगंगा को.ऑप.हौ.सो. या संस्थेच्या बंगल्यांचे भोगवटा प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल अशी नोटीस महानगरपालिकेने देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास परवानगी घेताना जमीन मालक बाणगंगा सोसायटी यांनी महानगरपालिकेकडे नकाशे सादर करून प्रत्यक्षात २१३५०.२५ चौ.फु. FSI विक्री केलेला असताना महानगरपालिकेला १९११३.२५ चौ.फु. FSI दर्शविणारे नकाशे सादर करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इंदिरा अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो. ची भोगवटा प्रमाणपत्राची नस्ती महानगरपालिकेचे अधिकारी तसेच मूळ मालकांच्या संगनमताने गहाळ करण्यात आली असून भोगवटा प्रमाणपत्राअभावी सदर संस्था राज्य शासनाच्या इमारत स्वयं-विकास या योजनेचा लाभ घेऊ शकत नसून, सदर संस्थेच्या भोगवटा प्रमाणपत्राची नस्ती गहाळ झाल्याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे.

(५) असल्यास, डी.पी.रोड व सेटबॅक त्वरित महानगरपालिकेने ताब्यात घेऊन इंदिरा को.ऑप.हौ.सो. भोगवटा प्रमाणपत्र देऊन इमारत स्वयं-विकास या योजनेचा (Self Development Scheme) लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

मे. बाणगंगा को.ऑ. हौ. सोसायटीच्या मंजूर अभिन्यासामध्ये एकूण ०६ इमारतीं असून, सदर इमारतींना बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे सशर्त भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

कार्यकारी अभियंता (विकास नियोजन) पुर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील दिनांक १२/११/२०२५ रोजीचे पत्रान्वये बाणगंगा को.ऑप. सोसायटी लि. यांना न.भू.क्र.२९२ मौजे-देवनार येथील विकास आराखडा २०३४ नुसार बाधित होणाऱ्या १३.४० मी. रुंद विकास योजना रस्ता व रुग्णालय (RH१.२) या भूखंडाचा मोकळा ताबा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३२ नुसार देण्याचे कळविले होते.

तथापि, बाणगंगा को.ऑप. सोसायटी लि. यांनी दिनांक २०/०२/२०२६ च्या पत्रान्वये सदर भूखंडासंबंधी मा.नागरी व दिवाणी न्यायालयामध्ये दाखल खटला क्र.०१०४६३७/२०२४ न्यायप्रविष्ट असून, सदर भूखंडाचा ताबा सध्या मे.व्ही.एम. एन्टरप्रायझेस (श्री.महेश नेरूरकर व श्रीमती वासंती नेरूरकर) यांचेकडे असल्याचे कळविले आहे. तसेच सोसायटीने जागा हस्तांतरणाबाबत कोणताही अर्ज महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही.

(२) अशी बाब नाही.

सदर अभिन्यासातील इमारतींना देण्यात आलेले भोगवटा प्रमाणपत्र रद्द करणेबाबत महानगरपालिकेमार्फत कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आलेली आढळून येत नाही.

(३) सदरहू भूभागाचा अभिन्यास आराखडा व इमारतीचे आराखडे मंजूर करताना भूखंडाचे क्षेत्र १८,५२९.४० चौ.मी. इतके नमूद करण्यात आलेले आहे व त्या अनुषंगाने एकूण ०६ इमारतींना महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच इंदिरा अपार्टमेंट इमारत क्र. 'एफ' या इमारतीस देण्यात आलेल्या मंजुरीनुसार महानगरपालिकेद्वारे एकूण ५८२९.०८ चौ.मी. म्हणजे ०.५५६ इतका चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात आलेला आहे.

(४) अशी बाब नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे विकास परवानगी देण्यात आलेल्या एकूण ०६ इमारतींच्या धारिणी महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव (पुर्व उपनगरे) यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

(५) बाणगंगा को.ऑप. सोसायटी लि. यांनी दिनांक २०/०२/२०२६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविल्यानुसार, न.भू.क्र.२९२, मौजे- देवनार या भूखंडासंबंधी मा.नागरी व दिवाणी न्यायालयामध्ये दाखल खटला क्र.०१०४६३७/२०२४ न्यायप्रविष्ट असून, सदर भूखंडाचा ताबा सध्या मे.व्ही.एम. एन्टरप्रायझेस (श्री.महेश नेरूरकर व श्रीमती वासंती नेरूरकर) यांचेकडे असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे मा.नागरी व दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच स्वंयपुनर्विकास बाबतीत संबंधित सोसायटीने महानगरपालिकेस प्रस्ताव सादर केल्यास त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०३४ व प्रचलित धोरणामधील तरतुदीनुसार नियमानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

-----------------

## राज्यातील औषधालयांमध्ये प्रिस्क्रीप्शनशिवाय प्रतिजैविक औषधांची विक्री करण्यात येत असल्याबाबत

**(४२) * ६७०० डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध औषधालयांमध्ये (Pharmacies) डॉक्टरांच्या अधिकृत चिठ्ठीशिवाय किंवा केवळ मेडिकल स्टोअरमधून थेट प्रतिजैविक औषधांची (Antibiotics) सर्रास विक्री होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागापुरती मर्यादित असलेली बेकायदेशीर औषध विक्री आता थेट शहरातील किराणा दुकाने, जनरल स्टोअर्स, आणि रस्त्यावरील टपऱ्यांवर होत असून सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी, पोटदुखी यासाठी लागणाऱ्या गोळ्यांची डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खुलेआम विक्री होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विक्री होणाऱ्या औषधांचे नाव, मात्रा, दुष्परिणाम किंवा कालबाह्यता याची कोणतीही माहिती दिली जात नसून डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय किंवा केवळ मेडिकल स्टोअरमधून थेट औषधे घेऊन त्यांचे सेवन केल्यामुळे नागरिकांमध्ये ‘अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स’ (AMR) चा धोका वाढत असून, यामुळे भविष्यात औषधांचा प्रभाव कमी होण्याचे गंभीर संकट निर्माण झाले असून औषध विक्रीच्या नियमांचे थेट उल्लंघन करून विना-प्रिस्क्रिप्शन औषध विक्री करणाऱ्या संस्थांवर अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागामार्फत कठोर देखरेख व कारवाई केली जात नसल्याने अशा बेकायदा कृतींना प्रोत्साहन मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जनतेचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि ‘सेल्फ मेडिकेशन’ टाळण्यासाठी राज्यातील सर्व औषधालयांमध्ये डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय अँटिबायोटिक औषधांच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याबाबत नवीन धोरण तयार करुन सुधारणा करण्याच्या दृष्टीने तसेच औषध विक्रीच्या नियमांचे थेट उल्लंघन करून विना-प्रिस्क्रिप्शन औषध विक्री करणाऱ्या संस्थांवर अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागामार्फत देखरेख व कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, अशा प्रकारे बेकायदेशीर औषधाची विक्री ही ग्रामीण भागाबरोबरच शहरातही होत असून यास जबाबदार असणाऱ्या औषधालये, किराणा दुकाने, जनरल स्टोअर्स, आणि रस्त्यावरील टपऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ अंतर्गत जनतेचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि सेल्फ मेडिकेशन टाळण्यासाठी डॉक्टरांच्या प्रिस्क्रीप्शनशिवाय अँन्टीबायोटीक औषधांच्या विक्रिवर प्रतिबंध करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत औषध निरीक्षकांद्वारे वेळोवेळी किरकोळ औषध विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात येतात. त्यावेळी प्रतिजैविक औषधांची (Antibiotics) व इतर औषधांची विक्री विना प्रिस्क्रीप्शन केली जाते किंवा कसे, ही बाब पडताळण्यात येते.

विना प्रिस्क्रीप्शन अनुसूचीतील औषधांची विक्री केल्या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाद्वारे माहे एप्रिल, २०२४ ते माहे जानेवारी, २०२६ या कालावधीत खालीलप्रमाणे परवानाधारकांवर कारवाई केली आहे:-

| कालावधी | किरकोळ विक्री पेढयांच्या केलेल्या तपासण्या | परवाने निलंबन | परवाने रद्द |
|---|---|---|---|
| एप्रिल, २०२४ ते मार्च, २०२५ | १२०२२ | १४८४ | १४२ |
| एप्रिल, २०२५ ते जानेवारी, २०२६ | ५६२८ | १०७५ | ९५ |

अँन्टीबायोटीक गटातील औषधे अनुसूची एच व एच-१ गटात मोडतात. एच व एच-१ प्रवर्गातील औषधे ही रजिस्टर्ड मेडीकल प्रॅक्टीशनरच्या चिठ्ठीनेच विकावी, असे परवानाधारक औषध विक्रेत्यास औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मधील नियम ६५ अन्वये बंधनकारक आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबुर (मुंबई) येथील घाटला भागातील एसआरए प्रकल्प व इतर वसाहतींचा विकास करण्याबाबत

**(४३) * ८५५३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबुर, मुंबई येथील घाटला भागातील एसआरए प्रकल्पासह चेंबूर परिसरातील सिध्दाजर्थ कॉलनी, चेंबूर कॅम्प, ओल्ड बराक, सिंधी वसाहतीच्या विकासाचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना चालना देण्यासाठी या संपूर्ण परिसराचा एकात्मिक पुनर्विकास करण्यात येणार आहे काय, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित प्रकल्पांमुळे स्थानिक रहिवासी हक्काच्या घराच्या प्रतीक्षेत असून, त्यांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. मुंबई चेंबूर परिसरातील झोपडपट्ट्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन चेंबूरच्या विकासातील प्रमुख अडथळा ठरत असलेल्या सदर प्रकल्पांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

चेंबुर येथील घाटला भागातील समूह झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुनर्विकास) मधील कलम ३ के (१) अन्वये दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१० रोजी मान्यता दिली आहे. सदर योजनेत एकूण २२ नियोजित संस्था असून अंदाजे एकूण ७००० झोपडीधारक समाविष्ट आहेत. सदर २२ नियोजित संस्थांपैकी ८ संस्थांचे परिशिष्ट-२ प्राप्त झाले आहे. सदर योजनेंतर्गत आजमितिस एकूण ६ पुनर्वसन इमारतीचे आराखडे मंजूर आहेत. त्यापैकी दोन इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन त्यामध्ये ४५१ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. अन्य २ इमारतीचे बांधकाम अंतिम टप्यात असून त्यामध्ये ३१४ झोपडीधारकांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे. तर इतर दोन इमारतींच्या बांधकामाकरीता पर्यावरण विभागाची ना-हरकत प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, सिध्दार्थ कॉलनी येथील मौजे चेंबूर या भूभागावर सिध्दार्थ कॉलनी विकास सेवा संघ फेडरेशेन हाऊसिंग (नियो.) या संस्थेच्या विकासाकरीता विकासक, मे. रुपारेल बिल्डकॉन प्रा.लि. यांना दिनांक ०६ ऑगस्ट, २०२१ रोजी आशयपत्र जारी करण्यात आले आहे. तथापि, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिका व प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत समिती गठित करण्यात आली असून सदर समितीच्या अहवालानूसार ५१% झोपडीधारकांची संमती पडताळणी करणे, विकासकाची आर्थिक क्षमता तपासणे, झोपडीधारकांचे ५१% वैयक्तिक करारनाम्याची पुर्नतपासणी करणे इ. कार्यवाही सुरु आहे.चेंबूर कॅम्प, ओल्ड बॅराक, सिंधी वसाहतमधील बहुतांश जागेची मालकी केंद्र शासनाची आहे. तथापि, या भूभागावर इंदिरा नगर सह. गृह.संस्था नियो, व मोक्षपूर्ती सह. गृह.संस्था नियो. या झो.पु. योजना फक्त स्विकृत आहेत. सदर दोन्ही योजनांचे अंतिम परिशिष्ट -२ करण्याची प्रक्रिया सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत सुरु आहे.
(२) व (३) मुंबईतील प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना चालना देण्यासाठी व संपूर्ण परिसराचा एकात्मिक पुनर्विकास करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई अंतर्गत झोपडपट्टी समुह पुनर्विकास योजना राबविण्याबाबत शासनाने दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी निर्णय घेतलेला आहे. चेंबूर येथील घाटला भागातील एसआरए प्रकल्पासह चेंबूर परिसरातील सिध्दार्थ कॉलनी, चेंबूर कॅम्प, ओल्ड बराक, सिंधी वसाहती या क्षेत्राच्या समुह पुनर्विकासाबाबत सद्य:स्थितीत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्धापूर ते तामसा (जि.नांदेड) राष्ट्रीय महामार्गावरील क्रॅश बॅरियरमुळे अपघात होऊन व्यक्तीचा मृत्यू झाल्याबाबत

**(४४) * ८०१० श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्गवर (ता.तामसा, जि.नांदेड) तामसा नजीक नियोजित टोल नाक्यावर रुद्राणी कन्स्ट्रक्शनच्या बेजबाबदारपणामुळे पर्यायी रस्ता न काढता रस्त्यावर टाकण्यात आलेल्या क्रॅश बॅरियरला मोटारसायकलची धडक लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी तामसा पोलीस स्थानकात संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर टोलनाका उभारणीचे काम गेल्या वर्षभरापासून अत्यंत धिम्या गतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी असलेल्या उक्त ठेकेदार कंपनीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे.

कोपरगाव-जिंतूर-अर्धापूर-तामसा-हिमायतनगर हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ आय असा वर्गीकृत असून या महामार्गावरील अर्धापूर ते हिमायतनगर ही लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या आखत्यारीत येते. रा.म. क्र. ७५२ आय या महामार्गावरील कि.मी. ०/०० ते कि.मी. ६४/७०० या लांबीतील रस्त्याची पुनर्बांधणी व दर्जोन्नतीचे काम रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर, लि., जियांक्षी कन्स्ट्रक्शन इंजिनियरींग ग्रुप कं. लि. (जे.व्ही.) छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत प्रगतीत आहे.
अपघात झालेल्या ठिकाणी पर्याय रस्ता उपलब्ध होता.
(२) हे खरे आहे.

पोलीस विभागाच्या अहवालानुसार अर्धापूर-तामसा (रा.म. क्र. ७५२ आय) या महामार्गावर तामसा जवळील टोलनाक्याच्या बांधकामाजवळ घडलेल्या अपघाताबाबत रुद्राणी कंपनीचे प्रतिनिधी व प्रोजेक्ट मॅनेजर यांच्या विरोधात पोलीस स्टेशन तामसा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कामाच्या एकूण ६४.७० कि.मी. लांबीपैकी सर्व लांबीतील दुपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित टोलनाका बांधकाम व इतर कामे प्रगतीत आहेत.

टोलनाक्याकरीता लागणाऱ्या जागेच्या भूसंपादन प्रक्रियेस झालेल्या विलंबामुळे टोलनाक्याचे काम सुरू करण्यास विलंब झाला असून सद्य:स्थितीत टोलनाक्याचे काम प्रगतीत आहे.
(३) व (४) भूसंपादन प्रक्रियेस झालेल्या विलंबामुळे टोलनाक्याचे बांधकाम व इतर कामे नियोजित वेळेत पूर्ण होणे शक्य नसल्याने संबंधित ठेकेदारासोबत पूरक करारनामा करून घेण्यात आला असून टोलनाक्याचे बांधकाम व इतर कामे या पूरक करारनाम्याचा भाग आहे. सदर पूरक करारनामा १५ डिसेंबर, २०२६ पर्यंत वैध असून त्यापूर्वी टोलनाका बांधकाम व इतर कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.